YF circular 23-24

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.

(नॅक अ दर्जा )

## विद्यार्थी विकास


संचालक (का.) २४०३१३२
विद्यार्थी विकास २४०३१३३
फॅक्स : (०२४०) २४०३१३४, २४०३१५०
तार : बामुसिटी
Web Site : www.bamu.net
E-Mail : dsw@bamu.ac.in

डॉ. कैलास अंभुरे

संचालक, विद्यार्थी विकास
विद्यापीठ परिसर,
छत्रपती संभाजीनगर - ४३१ ००४.
(महाराष्ट्र)


संदर्भ क्र. : संविवि/ २०२४/ 18492 - 18941

दिनांक : ६ डिसेंबर २०२४

प्रति,
**मा. प्राचार्य,**
सर्व संलग्नीत महाविद्यालये,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर
मराठवाडा विद्यापीठ,
**छत्रपती संभाजीनगर.**

प्रति,
**मा. संचालक**
डॉ. बाबासाहेब आंबेडकर
मराठवाडा विद्यापीठ उपकेंद्र,
**धाराशिव.**

विषय : **केंद्रीय युवा महोत्सव २०२४-२५**

**महोदय / महोदया,**

आपणास कळविण्यास आनंद वाटतो की, २०२४-२५ या शैक्षणिक वर्षाचा **केंद्रीय युवक महोत्सव डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ परिसरात येथे दि. २५/१२/२०२४ ते २८/१२/२०२४ या दरम्यान आयोजित** करण्यात आला आहे. या महोत्सवातील विद्यार्थी कलावंत, साथीदार व संघप्रमुखांची **ऑनलाईन नोंदणी दि. ७/१२/२०२४ ते १८/१२/२०२४** या कालावधीत करावी.

आपल्या महाविद्यालयाच्या संघाची प्रवेशिका सोबत जोडलेल्या **'प्रपत्र-अ'** मध्ये भरावी तसेच विविध सहा विभागातील स्पर्धेमध्ये भाग घेणाऱ्या स्पर्धकांची माहिती ऑनलाईन भरावी.
तसेच केंद्रीय युवक महोत्सवाचा निधी ऑनलाईन नोंदणी नंतर येणाऱ्या लिंकवर ऑनलाईन भरणा करण्यात येऊन त्याची पावती प्रवेशिकेसोबत जोडण्यात यावी. या महोत्सवाची प्रवेशिका संचालक, विद्यार्थी विकास विभागास दि. १८ डिसेंबर २०२४ रोजी मध्यरात्री १२.०० वाजेपर्यंत ऑनलाईन पाठविण्यात यावी. करिता लिंक
**https://online.bamu.ac.in/unic/yuva2024/login.php**

**निर्धारित वेळेनंतर आलेल्या प्रवेशिकांचा विचार करण्यात येणार नाही.** सदरील युवक महोत्सवाचे वेळापत्रक नंतर कळविण्यात येईल. युवक महोत्सव यशस्वी करण्यासाठी आपल्या सहकार्याची आवश्यकता आहे. आपण सर्वतोपरी सहकार्य कराल अशी खात्री आहे.

धन्यवाद,

सोबत :-
०१) नियम
०२) प्रवेशिका (प्रपत्र-अ)
०३) प्राचार्य / संचालकांचे हमीपत्र
०४) नमुना आय फॉर्म

आपला विश्वासू
(सही)
**संचालक**
विद्यार्थी विकास मंडळ

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर

नॅक ‘अ+’ दर्जा

## केंद्रीय युवा महोत्सव २०२४-२०२५

### सुधारित महत्त्वाचे नियम

- **प्रत्येक महाविद्यालयाने स्पर्धेत सहभाग घेणे अनिवार्य आहे.**
- **जर महाविद्यालय केंद्रीय युवक महोत्सवात सहभागी झाले नाही, तर महाविद्यालयास रू. १००००/- दंड निश्चित करण्यात आला आहे.**
- **प्रवेश शुल्क :**

  युवक महोत्सवामध्ये भाग घेण्यासाठी विद्यापीठाने खालीलप्रमाणे शुल्क निर्धारित केले आहे.

  **१. प्रत्येक सांघिक स्पर्धेकरिता - रू. २००/-**

  **२. प्रत्येक वैयक्तिक स्पर्धेकरिता - रू. १००/-**

  महाविद्यालयास जेवढ्या स्पर्धांमध्ये संघ पाठवायचा आहे त्यानुसार प्रवेश शुल्काची रक्कम **कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर** यांना Online ट्रान्सफर करावी.

  - प्रवेश शुल्काशिवाय कोणत्याही महाविद्यालयाच्या संघास स्पर्धेमध्ये भाग घेण्याची परवानगी देता येणार नाही.
  - **युवा महोत्सवाची नोंदणी केवळ आणि केवळ ऑनलाईन पद्धतीनेच** स्वीकारण्यात येणार आहे. नोंदणी लिंक https://online.bamu.ac.in/unic/yuva२०२४/login.php
  - **महाविद्यालयाचा संलग्नीकरण आयडी (Affiliation ID) व पासवर्ड हाच युवक महोत्सव नोंदणीसाठीचा ID व Password असेल.**

    जसे- Id: **EA०५५७६** आणि Password: EA०५५७६_***
  - **नोंदणी दि. ७ डिसेंबर २०२४ ते १८ डिसेंबर २०२४ रोजी मध्यरात्री १२.०० वा. पर्यंत सुरू राहील**. यानंतर कोणत्याही प्रकारे नोंदणीस मुदतवाढ देण्यात येणार नाही.
  - ऑनलाईन भरलेले सर्व फॉर्म दि. २५ डिसेंबर २०२४ **पूर्वी प्रत्यक्ष रिपोर्टिंगवेळी अत्यावश्यक स्वाक्षरी व कागदपत्रांसह सादर करणे बंधनकारक** आहे.
  - नोंदणी फॉर्मसोबतची **सर्व प्रपत्रे भरणे अनिवार्य** आहे.
  - कला सादरीकरणासंदर्भातील शेवटी जोडलेले **हमीपत्र प्राचार्यांच्या स्वाक्षरी व शिक्क्यासह** प्रत्यक्ष नोंदणीवेळी सादर करणे अनिवार्य आहे.

- नाट्यसंहितेसंदर्भातील सेन्सॉर प्रमाणपत्रा करिताचा **नमुना-आय** फॉर्म **भरून** सांस्कृतिक कार्य संचालनालय, **रंगभूमी परिनिरीक्षण मंडळ, मुंबई यांच्याकडे नोंदणी शुल्क भरल्याची पावती** कला **सादरीकरणापूर्वी जमा करणे बंधनकारक आहे.**

## ➢ ऑनलाईन नोंदणीसाठी अत्यावश्यक कागदपत्रे व माहिती

- विद्यार्थ्याचा PRN क्रमांक.
- विद्यार्थ्यांचे जन्मतारीख असलेले दहावी बोर्ड प्रमाणपत्र-सनद (SSC Certificate)
- विद्यार्थ्यांचे आधार कार्ड (Students Aadhar Card)
- शेवटच्या परीक्षेचे गुणपत्रक (Last Exam/Sem. Marks Memo)
- संघव्यवस्थापकांचे नाव व अन्य माहिती

## ➢ फॉर्मसोबत प्रत्यक्ष सादर करावयाची अत्यावश्यक कागदपत्रे

- ऑनलाईन भरलेल्या फॉर्मची प्रिंट व सर्व प्रपत्रे (प्राचार्यांच्या स्वाक्षरी व शिक्क्यासह)
- ऑनलाईन शुल्क भरल्याची पावती -प्रिंट
- विद्यार्थ्याचे आधार कार्ड
- विद्यार्थ्याचा २ पासपोर्ट फोटो- प्रती
- विद्यार्थ्यांचे जन्मतारीख असलेले दहावी बोर्ड प्रमाणपत्र-सनद (SSC Certificate)
- शेवटच्या परीक्षेचे गुणपत्रक (Last Exam/Sem. Marks Memo)
- प्राचार्यांचे कला सादरीकरणा संदर्भातील हमीपत्र
- नाट्य परिनिरीक्षण मंडळाकडे संहिता परीक्षणासाठी सादर केलेल्या नमुना 'आय'ची नोंदणी पावती
- संघव्यवस्थापकांचे ओळखपत्र/आधारकार्ड
- संघव्यवस्थापकांचे २ पासपोर्ट फोटो

## ➢ महाविद्यालयांसाठी अत्यावश्यक सूचना

१. केवळ आपल्या महाविद्यालयात प्रवेश असलेल्या विद्यार्थी कलावंतांची केंद्रीय युवक महोत्सवात नोंदणी करावी.

२. याकरिता प्रत्येक विद्यार्थ्यांचे PRN क्रमांक काळजीपूर्वक द्यावेत.

३. युवक महोत्सवात संलग्नित महाविद्यालयात प्रवेश नसलेल्या व्यावसायिक कलावंतांना सहभागी केल्याचे आढळून आल्यास कलाप्रकारांचे सादरीकरण बंद करून संघ/ महाविद्यालयावर महोत्सवात बंदी घालण्यात येईल.

४. महाविद्यालयांनी विद्यापीठास विद्यार्थी कलावंतांची चुकीची, खोटी माहिती दिल्यास संबंधित महाविद्यालयावर **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा-२०१६ नुसार कठोर कारवाई करण्यात येईल.** प्रसंगी महाविद्यालयाने विद्यापीठास चुकीची माहिती देऊन फसवणूक केल्याप्रकरणात गुन्हा दाखल करण्यात येईल. असा निर्णय विद्यार्थी विकास मंडळाच्या सल्लागार समितीच्या बैठकीत घेण्यात आला आहे.

५. संघाचे गैरवर्तन/ शिस्तभंग/ सहभागी नसलेल्या कलावंताद्वारे सादरीकरण केल्यास याची संपूर्ण जबाबदारी प्रथम संघप्रमुख/संघव्यवस्थापकांची आणि महाविद्यालयाच्या प्राचार्यांची असेल.

६. स्पर्धेचे **व्हिडिओ चित्रीकरण व YouTube द्वारे थेट प्रक्षेपण** करण्यात येणार असल्याने केवळ आपल्या महाविद्यालयात प्रवेशित विद्यार्थ्यांचीच आपल्या महाविद्यालया अंतर्गत महोत्सवात नोंदणी करण्याची काळजी घ्यावी.

७. केंद्रीय युवक महोत्सवात **सहभागी संघाच्या संपूर्ण अचूक माहितीची जबाबदारी संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांची असेल.**

## ➢ स्पर्धकांची पात्रता

- डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या सर्व शैक्षणिक विभागातील तसेच सर्व संलग्नित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना युवा महोत्सव स्पर्धेमध्ये भाग घेता येईल.
- विद्यार्थी कलावंत हा महाविद्यालयाचा पूर्णवेळ विद्यार्थी असावा.
- स्पर्धकाचे वय स्पर्धेच्या तारखेस २५ वर्षांपेक्षा कमी असावे. वय वर्ष २५ असल्यास स्पर्धक अपात्र ठरेल.
- **केवळ नियमित, पूर्णवेळ विद्यार्थी** जे किमान एका शैक्षणिक वर्षाच्या कालावधीच्या पदवी किंवा पदव्युत्तर पदवीमध्ये प्रवेश घेतलेले आहेत आणि ज्यांची परीक्षा विद्यापीठाद्वारे १२वी परीक्षा किंवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर घेतली जाते, तेच पात्र ठरतील. **अशा विद्यार्थ्यांचा PRN असणे अनिवार्य आहे.**
- विद्यार्थी कलावंतांनी खालील अटी पूर्ण करणे अनिवार्य आहे-
  - विद्यार्थ्याने संबंधित विद्यापीठाच्या संलग्न महाविद्यालय / घटक महाविद्यालय / मान्यताप्राप्त संस्था / शैक्षणिक विभागाच्या प्रथम प्रवेशासाठी पात्र ठरविणारी परीक्षा उत्तीर्ण केल्यापासून ७ वर्षांहून अधिक काळ गेला नसावा.

- तसेच, विद्यार्थी आपल्या शैक्षणिक कार्यक्रमाच्या नियमित कालावधीपेक्षा **एक वर्ष जास्त** कालावधीसाठी सहभागी होऊ शकतात.

  **स्पष्टीकरण :**
  तीन वर्षांच्या शैक्षणिक पदवीस (उदा. बी.ए., बी.एस्सी., बी.कॉम.) शिकणारे विद्यार्थी चार वर्षे सहभागी होऊ शकतात, तर चार वर्षांच्या अभ्यासक्रमांचे (उदा. बी.ई., बी.टेक.) विद्यार्थी पाच वर्षे सहभागी होऊ शकतात.

- विद्यार्थी एका शैक्षणिक वर्षात एकापेक्षा अधिक महाविद्यालय/विभागांचे प्रतिनिधित्व करू शकत नाहीत.
- विद्यापीठ किंवा महाविद्यालयात तात्पुरता प्रवेश घेतलेला विद्यार्थी पात्र मानला जाणार नाही.
- विद्यार्थ्याने एका विभाग/महाविद्यालयातून दुसऱ्या विभाग/महाविद्यालयात स्थलांतर केल्यास, नवीन विभाग/महाविद्यालयात नियमित प्रवेश घेतल्यानंतरच तो पात्र मानला जाईल.

➢ **अपात्रता - पात्रतेचे नियम भंग केल्याबद्दल**

विद्यार्थ्याने पात्रतेच्या अटींचे उल्लंघन केल्यास, तो स्पर्धक तीन शैक्षणिक वर्षांसाठी (चालू शैक्षणिक वर्षासह) नैसर्गिकरीत्या अपात्र ठरेल.

> **अत्यंत महत्त्वाचे : आपल्या सुरक्षेसाठी सर्व रंगमंच व भोजन व्यवस्थेच्या ठिकाणी CCTV कॅमेऱ्यांची व्यवस्था करण्यात आली आहे.**

युवा महोत्सव 2024

## ➢ सामान्य मार्गदर्शक तत्त्वे व नियमावली

### १. संघाची क्षमता (Team Contingent)

- प्रत्येक महाविद्यालयातून संघाची जास्तीत जास्त संख्या ४५ असेल.
- साथी कलाकार (Accompanists) शक्यतो विद्यार्थीच असावेत, ज्यांना सहभाग प्रमाणपत्र दिले जाईल.
- योग्य विद्यार्थी उपलब्ध नसल्यास साथी कलाकार म्हणून बाहेरच्या व्यक्तींना परवानगी आहे.
- **अतिरिक्त व्यक्ती आणण्याचे टाळावे.** कोणत्याही परिस्थितीत अतिरिक्त व्यक्तींना मान्यता दिली जाणार नाही.
- **स्वरूप**

| विवरण | संख्या |
|---|---|
| विद्यार्थी कलावंत साथी कलाकारांसह | ४३ |
| संघव्यवस्थापक (पुरूष) | ०१ |
| संघव्यवस्थापक (स्त्री) | ०१ |
| **एकूण** | **४५** |

## २. संघप्रमुख

- स्पर्धेत सहभागी होणाऱ्या महाविद्यालयाने **जास्तीत जास्त दोन व्यक्ती** संघप्रमुख/ संघ व्यवस्थापक म्हणून नियुक्त कराव्यात.
- संघप्रमुखांचे ओळखपत्र सोबत असावे.
- हे प्रमुख विद्यापीठाच्या आयोजक समितीसोबत समन्वय साधतील.
- संघाचे गैरवर्तन/ शिस्तभंग/ सहभागी नसलेल्या कलावंताद्वारे सादरीकरण केल्यास याची संपूर्ण जबाबदारी संघप्रमुख/संघव्यवस्थापकांची असेल. तसेच यासंदर्भाने **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा-२०१६ नुसार होणाऱ्या कारवाईस संघव्यवस्थापकांना सामोरे जावे लागेल.**
- संघातील विद्यार्थीनींसोबत महिला व्यवस्थापक/संघप्रमुख अनिवार्य आहे.
- **संघप्रमुखांनी पूर्णवेळ आपल्या संघासोबत विद्यापीठ परिसरात थांबणे** बंधनकारक आहे.

## ३. ओळखपत्र

प्रत्येक सहभागी विद्यार्थी कलावंतांकडे व संघप्रमुखांकडे संबंधित महाविद्यालयाच्या **प्राचार्यांनी सही केलेले फोटोसह ओळखपत्र** असणे आवश्यक आहे.

## ४. प्रवास आणि प्रवासादरम्यान अन्न खर्च

- **प्रवास खर्च** : सहभागी महाविद्यालयाने संघाचा महाविद्यालय ते विद्यापीठापर्यंतचा प्रवास खर्च स्वत: करावा.
- **अन्न खर्च** : प्रवासादरम्यान संघाचा नाश्ता व जेवणाचा खर्चदेखील सहभागी महाविद्यालयाने करावा.

## ५. भोजन व्यवस्था

विद्यापीठाकडून केंद्रीय युवक महोत्सवाच्या पहिल्या दिवसापासून ते शेवटच्या दिवशी दुपारच्या जेवणापर्यंत चहा, नाश्ता, भोजन उपलब्ध करून दिले जाईल. संघव्यवस्थापकांनी स्वत: पैसे भरून कुपन खरेदी करून जेवण घ्यावे **किंवा** पुरवठादार/विक्रेत्यांकडून खाद्यान्नाचे विविध स्टॉल्स लावण्यात आलेले असतील तेथून संघाकरिता भोजन विकत घेता येईल.

## ६. निवास आणि भोजन

- महोत्सवाच्या कालावधीत विद्यार्थी कलावंत व संघप्रमुखांसाठी विद्यापीठ परिसरातील विद्यार्थी वसतिगृह, सामूहिक कक्ष, विभाग इत्यादी ठिकाणी **विनामूल्य निवास** उपलब्ध असेल.
- अंथरण्याकरिता सतरंज्या/मॅटची व्यवस्था विद्यापीठाकडून करण्यात येईल.

## ७. कपडे

सद्य:स्थितीतील थंडी लक्षात घेता, विद्यार्थी कलावंत व संघव्यवस्थापकांनी **गरम अंथरून-पांघरूण, ब्लँकेट्स, लोकरीचे कपडे, स्वेटर, अत्यावश्यक औषधी, कुलूप इत्यादी आवश्यक वस्तू** सोबत आणणे अनिवार्य आहे.

## ८. लसीकरण

सर्व सहभागी विद्यार्थी कलावंत आणि संघव्यवस्थापकांनी **कोविड, कॉलरा, टायफॉइड इत्यादी रोगांसाठी लसीकरण करून घेणे आवश्यक आहे.**

## ९. शिस्त

i. जर कोणत्याही संघाचे वर्तन केंद्रीय युवक महोत्सवाच्या उद्दिष्ट वा नियमांच्या विरोधी आढळले, तर **विद्यापीठाद्वारे सदस्य/संघावर कठोर कारवाई करण्यात येईल**, तसेच संबंधित व्यक्ती/ संघाला तीन शैक्षणिक वर्षांसाठी अपात्र ठरवले जाईल.

ii. **विवादास्पद विषयांवर** कोणत्याही संघप्रमुखांनी किंवा संघ सदस्यांनी विद्यापीठाची प्रतिमा मलीन होईल याप्रकारे **कृती करू नये.**

iii. मद्यपान, छेडछाड, परीक्षकांवर प्रभाव टाकणे, अयोग्य वर्तन **कठोरपणे निषिद्ध आहे.**

iv. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर **संघाला निलंबित करून महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा-२०१६ नुसार कठोर कारवाई करण्यात येईल.**

v. संघातील शिस्त राखण्याची जबाबदारी संघप्रमुखांची असेल.

vi. कोणत्याही शिस्तभंगाच्या घटनेत, संघप्रमुखाने तात्काळ **संचालक, विद्यार्थी विकास** यांना माहिती द्यावी.

vii. गंभीर प्रकरणे **निरीक्षक समिती** आणि **कुलगुरू महोदयांच्या निदर्शनास आणली जातील.**

viii. सर्व सहभागी संघांनी विद्यापीठ प्रशासनाकडून दिलेल्या **सर्व सूचना काटेकोरपणे पाळणे बंधनकारक आहे.**

## १०. स्पर्धेसंबंधीचे इतर नियम

- महोत्सवात फटाके किंवा शस्त्रास्त्रांचा वापर सक्तपणे प्रतिबंधित आहे. तथापि, सांस्कृतिक सादरीकरणासाठी आवश्यक असल्यास, आयोजक सचिवांची (संचालक, विद्यार्थी विकास) पूर्व परवानगी घेऊन त्यांची प्रतिकृती वापरता येईल.
- **विद्यापीठाने उपलब्ध करून दिलेल्या निवास व्यवस्थेचा वापर करणाऱ्या प्रत्येक संघाने नोंदणीच्या वेळी रु. ५००/- रक्कम परतफेड योग्य अनामत रक्कम** म्हणून जमा करावी. दिलेल्या वस्तूंच्या नुकसानीसाठी किंवा मालमत्तेच्या नुकसानीसाठी ही रक्कम कपात केली जाईल.

- महाविद्यालयातील विद्यार्थी कलावंत, संघातील सदस्यांनी गैरवर्तणूक केल्यास त्यांच्यावर, संघावर, महाविद्यालयावर **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा-२०१६** नुसार शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल.
- स्पर्धेसाठी आवश्यक पोस्टर, साहित्य, संगीत, वाद्ये, मूकअभिनय, प्रहसनसाठी लागणारे साहित्य, विद्यार्थी कलावंत/संघाने सोबत आणावे.
- प्रत्येक कलाप्रकारातील प्रथम, द्वितीय व तृतीय अशी तीन पारितोषिके देण्यात येतील.
- परीक्षकांनी दिलेले निर्णय अंतिम असून सर्व स्पर्धकांवर, संघावर ते बंधनकारक राहतील.
- **ग्रामीण संघासाठीचा उत्कृष्ट संघ (चॅम्पीयनशिप) पुरस्कार ग्रामपंचायत/नगरपरिषद** असलेल्या ठिकाणच्या महाविद्यालयास देण्यात येईल.
- स्पर्धेच्या ठिकाणी स्पर्धेसाठी रिपोर्टिंगची घोषणा झाल्याच्या १० ते १५ मिनिटांत करावे आणि आपला सादरीकरणाचा क्रमांक आयोजन समितीकडून घेऊन आपली कला सादर करावी.
- **तीन वेळा संघाचा क्रमांक घोषित करण्यात येईल, तिसऱ्या कॉलनंतर संघ बाद करण्यात येईल.** किंवा संघाला सादरीकरणासाठी विद्यापीठ युवक महोत्सव आयोजन समितीची स्वतंत्र परवानगी घ्यावी लागेल, अन्यथा तो कलाप्रकार सादर करता येणार नाही.

## ११. कला प्रकार

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाद्वारे केंद्रीय युवक महोत्सवाकरिता संगीत, नृत्य, नाट्य, ललित कला, साहित्य व महाराष्ट्राच्या लोककला या सहा गटात ३६ कलाप्रकारांत स्पर्धा आयोजित केल्या आहेत-

### I. संगीत विभाग-Music Section

१. भारतीय शास्त्रीय गायन (वैयक्तिक)_ Indian Classical Vocal (Solo)
२. भारतीय शास्त्रीय तालवाद्य (वैयक्तिक) _ Indian Classical Instrumental Percussion_Taalvadya (Solo)
३. भारतीय शास्त्रीय सूरवाद्य (वैयक्तिक)_ Indian Classical Instrumental Non-Percussion_ Survadya (Solo)
४. भारतीय सुगम गायन (वैयक्तिक)_ Indian Light Vocal (Solo)
५. पाश्चात्य सुगम गायन (वैयक्तिक)_ Western Vocal (Solo)
६. भारतीय समूह गायन (सांघिक)_ Indian Group Song (Group)
७. पाश्चात्य समूह गायन (सांघिक)_ Western Group Song (Group)
८. लोक वाद्यवृंद (सांघिक)_ Folk Orchestra (Group)
९. कव्वाली (सांघिक)_ Qawaali (Group)
१०.जलसा (सांघिक)_ Jalsa (Group)

### II. नृत्य विभाग_Dance Section

११.लोक आदिवासी नृत्य (सांघिक)_ Indian Folk Dance (Group)

१२.शास्त्रीय नृत्य (वैयक्तिक)_ Indian Classical Dance (Individual)

### III. नाट्य विभाग_Theatre Section

१३.एकांकिका – मराठी/हिंदी (सांघिक)_ One Act Play-Marathi/Hindi (Group)

१४.प्रहसन (सांघिक)_Skit (Group)

१५.नकला (वैयक्तिक)_Mimicry (Individual)

१६.मूक अभिनय (सांघिक)_ Mime (Group)

### IV. ललित कला विभाग_Fine Arts Section

१७.चित्रकला (वैयक्तिक)_ On the Spot Painting (Individual)

१८.कोलाज (वैयक्तिक)_ Collage (Individual)

१९.पोस्टर (वैयक्तिक)_ Poster Making (Individual)

२०.मृदमूर्तीकला (वैयक्तिक)_ Clay Modeling (Individual)

२१.व्यंगचित्र (वैयक्तिक)_ Cartooning (Individual)

२२.रांगोळी (वैयक्तिक)_ Rangoli (Individual)

२३.स्पॉट फोटोग्राफी (वैयक्तिक)_ Spot Photography (Individual)

### V. साहित्य विभाग_Literary Section

२४.काव्यवाचन (वैयक्तिक)_Poetry Reading (Individual)

२५.वक्तृत्व (वैयक्तिक)_Elocution (Individual)

२६.वादविवाद (सांघिक)_ Debate (Group)

२७.प्रश्नमंजुषा (सांघिक)_ Quiz (Group)

### VI. महाराष्ट्राच्या लोककला विभाग_ Folk Art of Maharashtra

२८.पोवाडा (सांघिक)_ Powada (Group)

२९.भारूड (सांघिक)_Bharud (Group)

३०.वासुदेव (वैयक्तिक)_Vasudev (Individual)

३१.गोंधळ (सांघिक)_Gondhal (Group)

३२.भजन (सांघिक)_ Bhajan (Group)

३३.लोकगीत (सांघिक)_ Folk Song (Group)

३४.लोकनाट्य (सांघिक)_ Folk Drama (Group)

३५.लावणी (वैयक्तिक/सांघिक)_ Lavani (Individual/Group)

**३६. लघुपट (समूह)_Short Film (Group)**

याशिवाय,

उद्घाटन समारंभापूर्वी **शोभायात्रा_(Procession)** ही सांघिक स्पर्धा होईल.

## १२. स्पर्धा संचालन नियम

### I. संगीत विभाग

#### i) भारतीय शास्त्रीय गायन (वैयक्तिक स्पर्धा)

१. प्रत्येक सहभागी महाविद्यालयातून **फक्त १ विद्यार्थी** या स्पर्धेत सहभागी होईल.
२. सादरीकरण केवळ **हिंदुस्थानी** किंवा **कर्नाटकी शैलीत** करावे.
३. सादरीकरणाची वेळ **किमान ८ ते जास्तीत जास्त १० मिनिटे** असेल. वेळ गणना आयोजकांच्या अंतिम घोषणेनंतर लगेच सुरू होईल.
४. **मंच/वाद्य व्यवस्था करण्यासाठी जास्तीत जास्त ३ मिनिटे** दिली जातील.
५. वाद्यवृंद साथीदार कलाकारांची संख्या **कमाल २** असेल.
६. चित्रपट गीते सादरीकरणास अनुमती नाही.
७. सहभागी विद्यार्थी कलावंतांनी स्वतःची वाद्ये आणावी.
८. मूल्यांकन प्राधान्याने **राग निवड, सादरीकरण आणि एकूण प्रभाव** यावर आधारित असेल.

#### ii) भारतीय शास्त्रीय तालवाद्य (वैयक्तिक स्पर्धा)

१. प्रत्येक सहभागी महाविद्यालयातून **फक्त १ विद्यार्थी** या स्पर्धेत सहभागी होईल.
२. सादरीकरण केवळ **हिंदुस्थानी** किंवा **कर्नाटकी शैलीत** करावे.
३. सादरीकरणाची वेळ **किमान ८ ते जास्तीत जास्त १० मिनिटे** असेल.
४. **मंच/वाद्य व्यवस्था करण्यासाठी जास्तीत जास्त ३ मिनिटे** दिली जातील.
५. **फक्त २ साथी कलाकाराला** परवानगी असेल.
६. सहभागी विद्यार्थी कलावंतांनी स्वत: स्वतःची वाद्ये आणावी.
७. मूल्यांकन प्राधान्याने **ताल निवड, सादरीकरण आणि एकूण प्रभाव** यावर आधारित असेल.

#### iii) भारतीय शास्त्रीय सूरवाद्य (वैयक्तिक स्पर्धा)

१. प्रत्येक सहभागी महाविद्यालयातून **फक्त १ विद्यार्थी** या स्पर्धेत सहभागी होईल.

२. सादरीकरण **हिंदुस्थानी** किंवा **कर्नाटकी शैलीत** करावे.

३. सादरीकरणाची वेळ **किमान ८ ते जास्तीत जास्त १० मिनिटे** असेल.

४. **मंच/वाद्य व्यवस्था करण्यासाठी जास्तीत जास्त ३ मिनिटे** दिली जातील.

५. **फक्त २ साथी कलाकाराला** परवानगी असेल.

६. सहभागी विद्यार्थी कलावंतांनी स्वत: स्वतःची वाद्ये आणावी.

७. कॅसिओच्या वापरास परवानगी नाही; मात्र हार्मोनिअम, व्हायोलिन, सारंगी, बासरी, संतूर, रूद्रवीणा या भारतीय शास्त्रीय संगीतात वाजवल्या जाणाऱ्या वाद्यांचा समावेश असेल.

८. मूल्यांकन प्राधान्याने **स्वर, ताल, राग निवड आणि एकूण प्रभाव** यावर आधारित असेल.

### iv) भारतीय सुगम गायन (वैयक्तिक स्पर्धा)

१. प्रत्येक सहभागी महाविद्यालयातून **फक्त १ विद्यार्थी** या स्पर्धेत सहभागी होईल.

२. सादरीकरणाची वेळ **किमान ४ ते जास्तीत जास्त ६ मिनिटे** असेल.

३. गीत/ गजल/ भजन/ शब्द/ अभंग/ भावगीत/ इत्यादींचा समावेश असावा.

४. **मंच/वाद्य व्यवस्था करण्यासाठी जास्तीत जास्त ३ मिनिटे** दिली जातील.

५. साथी कलाकारांची संख्या **कमाल २** असेल.

६. या स्पर्धेत चित्रपट गीते सादर करण्यास परवानगी नाही.

७. मूल्यांकन प्राधान्याने **स्वर, ताल, रागाची निवड आणि एकूण प्रभाव** यावर आधारित असेल.

### v) पाश्चात्य सुगम गायन (वैयक्तिक स्पर्धा)

१. प्रत्येक सहभागी महाविद्यालयाचा **फक्त १ विद्यार्थी सहभागी** होईल.

२. विद्यार्थी फक्त **इंग्रजी भाषेत गाणे** सादर करेल.

३. विद्यार्थी कितीही गाणी सादर करू शकतो. **गाण्यांची संख्या मर्यादित** नाही.

४. सादरीकरणाची वेळ **किमान ४ आणि कमाल ६ मिनिटे** असेल.

५. वेळ गणना आयोजकांनी अंतिम घोषणा केल्यानंतर त्वरित सुरू होईल.

६. स्टेज/वाद्य व्यवस्था करण्यासाठी **किमान ३ मिनिटे वेळ** दिला जाईल.

७. साथी कलावंतांची **कमाल संख्या २** असावी.

८. विद्यार्थी/साथीदार सादरीकरणादरम्यान सिंथेसायझर किंवा इतर कोणतेही इलेक्ट्रॉनिक साधन वापरू शकतात.

९. यामध्ये चित्रपट गाणी सादर करता येतील.

१०. मूल्यांकन **गाण्याची निवड, स्वर, ताल, लय आणि एकूण प्रभाव** यावर आधारित असेल.

### vi) भारतीय समूह गायन (सांघिक स्पर्धा)

१. प्रत्येक सहभागी महाविद्यालयातून **किमान ४ आणि कमाल ६ विद्यार्थी** सहभागी होऊ शकतील.

२. गटाने **एक देशभक्ती गीत** आणि **एक भारतीय लोकगीत** सादर करावे.

३. गीते भारतातील कोणत्याही प्रादेशिक किंवा अधिकृत भाषेत असू शकतात.

४. दोन्ही गाण्यांसाठी सादरीकरणाची वेळ **किमान ८ ते जास्तीत जास्त १० मिनिटे** असेल.

५. **मंच/वाद्य व्यवस्था करण्यासाठी जास्तीत जास्त ५ मिनिटे** दिली जातील.

६. **साथी कलाकारांची संख्या कमाल ३** असेल. गायक वाद्ये वाजवू शकतात.

७. या स्पर्धेत चित्रपट गीते सादरीकरणास परवानगी नाही.

८. मूल्यांकन प्राधान्याने **संगीत रचना, गाण्यांची निवड, समन्वय, गाण्याचा दर्जा, सादरीकरण, मेकअप, वेशभुषा, हावभाव** आणि **एकूण परिणाम** यावर आधारित असेल.

### vii) पाश्चात्य समूह गायन (सांघिक स्पर्धा)

१. प्रत्येक सहभागी महाविद्यालयाने **किमान ४ आणि जास्तीत जास्त ६ विद्यार्थी** सदस्यांचा एक संघ पाठवावा.

२. संघ केवळ **इंग्रजी भाषेत गाणी** सादर करेल.

३. संघ कोणतेही गाणे सादर करू शकतो; गाण्यांच्या संख्येवर कोणतीही मर्यादा नाही.

४. गाण्यांसह संपूर्ण सादरीकरणाचा कालावधी **किमान ८ आणि जास्तीत जास्त १० मिनिटां**चा असेल.

५. वेळ गणना आयोजकांच्या अंतिम घोषणेनंतर लगेच सुरू होईल.

६. स्टेज किंवा वाद्य व्यवस्था करण्यासाठी **जास्तीत जास्त ५ मिनिटांचा** वेळ दिला जाईल.

७. **साथी कलावंतांची जास्तीत जास्त संख्या ३** असेल. मात्र, गायक गाण्याच्या वेळी पाश्चात्य वाद्य वाजवू शकतात.

८. या स्पर्धेत **चित्रपट गाणी** सादर करता येतील.

९. मूल्यांकन **रचना, गाण्यांची निवड, समन्वय, गायनाची गुणवत्ता, सादरीकरण आणि एकूण प्रभाव** यावर आधारित असेल; संघाची रंगभूषा, वेशभूषा आणि कृतींवर गुणदान आधारित नसेल.

### viii) लोक वाद्यवृंद (सांघिक स्पर्धा)

१. प्रत्येक सहभागी महाविद्यालयाने **किमान ६ आणि जास्तीत जास्त ९ विद्यार्थ्यांचा केवळ एक संघ** पाठवता येईल.

२. संघ फक्त विद्यार्थी/विद्यार्थीनी किंवा एकत्र विद्यार्थ्यांचा असू शकतो.

३. सादरीकरणाची **वेळ किमान ८ मिनिटे आणि जास्तीत जास्त १० मिनिटे** असेल.

४. आयोजकांच्या अंतिम घोषणेनंतर लगेच वेळ गणनास सुरुवात होईल. या वेळेमध्ये वाद्य व्यवस्था/ध्वनी व्यवस्था करण्यासाठी लागणारा वेळ समाविष्ट केला जाणार नाही.

५. सादरीकरणापूर्वी **वाद्य व्यवस्था/ध्वनी व्यवस्था** करण्यासाठी अतिरिक्त **१० मिनिटे** दिली जातील.

६. **जास्तीत जास्त ३ साथसंगतकारांना परवानगी** असेल. ते साथीदार सहभागींपेक्षा वेगळ्या पोशाखात असतील, जेणेकरून ते सहज ओळखता येतील. या तीन व्यवसायिक कलावंताची माहिती पासपोर्ट साईज फोटोसहीत युवक महोत्सवाच्या आयोजन समितीकडे देणे बंधनकारक राहील.

७. साथसंगतकार स्वतंत्रपणे बसतील/उभे राहतील आणि संघाचे नेतृत्व करणार नाहीत.

८. संघाने **महाराष्ट्रातील मूळ लोकसंगीताचे सादरीकरण** करावे. सादरीकरणात वाजवली जाणारी वाद्ये विशिष्ट लोककलेशी संबंधित आणि त्या लोककलांसाठी मूळ स्वरूपाची असावीत.

९. **चित्रपटांमध्ये वापरलेले लोकसंगीत** या स्पर्धेत सादरीकरणयोग्य असणार नाही.

१०. वाद्यांमध्ये **पाश्चात्य किंवा अभिजात वाद्यां**चा अंतर्भाव असू नये. तसेच इलेक्ट्रॉनिक वाद्यांच्या वापरास बंदी आहे.

११. मूल्यांकन प्राधान्याने **अस्सलपणा, रचना, समन्वय आणि वैविध्यावर** आधारित असेल; संघाची रंगभूषा, वेशभूषा आणि कृतींवर नाही.

### ix) कव्वाली (सांघिक स्पर्धा)

(कव्वाली ही एक सूफी इस्लामिक भक्ती संगीताची कला आहे, जी हिंदुस्तानात उदयास आली. सुरुवातीला कव्वाली ही हिंदुस्तानातील सूफी दर्गे किंवा धार्मिक स्थळांवर सादर केली जात असे. कव्वालीच्या पारंपरिक सादरीकरण शैलीत मुख्य गायक, कोरस आणि ढोलक, तबला, सतार यांसारख्या वाद्यांच्या साथीचा

समावेश असतो. कव्वाली केवळ संगीत नसून, ती सूफी विचारधारेचे भावनिक आणि आध्यात्मिक दर्शन घडवणारी एक प्रभावी कला आहे.)

१. प्रत्येक महाविद्यालयातील **६ विद्यार्थ्यांचा** (पुरुष, महिला किंवा संमिश्र) केवळ एक संघ स्पर्धेत सहभागी होऊ शकतो.

२. कव्वाली ही **राष्ट्रीय एकात्मता आणि सामुदायिक सौहार्द** यावर आधारित असावी. दोन रचनांपैकी एक रचना या थीमवर असणे आवश्यक आहे.

३. यामध्ये मुख्य **गायक आणि कोरस सादरीकरण करू शकतात**, तर **ढोलक, तबला, सतार** यांसारख्या वाद्यांच्या साथीने संगीत देता येईल.

४. जास्तीत जास्त **तीन साथसंगतकारांना** परवानगी असेल.

५. सादरीकरणासाठी **कमीत कमी ७ मिनिटे ते जास्तीत जास्त ८ मिनिटे** वेळ दिला जाईल.

६. संघाने **स्वत: स्वत:ची वाद्ये सोबत आणणे** आवश्यक आहे.

७. सादरीकरणापूर्वी **वाद्य व्यवस्था/ध्वनी व्यवस्था** करण्यासाठी अतिरिक्त **५ मिनिटे** दिली जातील.

८. कव्वाली मराठी/हिंदी वा दोन्ही भाषेतून सादर करता येईल.

९. मूल्यांकन प्राधान्याने **आशय आणि संकल्पना, गाण्याची गुणवत्ता, वाद्यसंगत, वेशभूषा** यावर आधारित असेल.

## x) जलसा (सांघिक स्पर्धा)

**प्रबोधनात्मक जलसांचे स्वरूप**

**अ) सत्यशोधकी जलसा**

महात्मा फुले यांच्या विचार आणि कार्याचे स्वरूप व आशय केंद्रस्थानी ठेवून सत्यशोधकी जलसांची निर्मिती असावी. पूर्वी सदरील प्रकारास लिखित संहितेचे बंधन नव्हते. मात्र स्पर्धेतील सादरीकरणासाठी वर्तमान स्थिती लक्षात घेता मुक्त सादरीकरण शक्य नाही. त्यामुळे संहिता लिखित असावी. सोबत महाविद्यालयांच्या प्राचार्यांचे परिनिरीक्षण प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

**ब) आंबेडकरी जलसा**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचे व विचारांचे स्वरूप व आशय केंद्रस्थानी ठेवून संहिता निर्मिती असावी. पूर्वी सदरील प्रकारास लिखित संहितेचे बंधन नव्हते. मात्र स्पर्धेतील सादरीकरणासाठी वर्तमान स्थिती लक्षात घेता मुक्त सादरीकरण शक्य नाही. त्यामुळे संहिता लिखित असावी. सोबत महाविद्यालयांच्या प्राचार्यांचे परिनिरीक्षण प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

**जलसांचे सादरीकरण :**

जलसाचे वरील दोन्ही प्रकार म्हणजे महाराष्ट्रातील लोकप्रिय तमाशा या लोककला प्रकाराचे परिष्कृत रूप आहे. काळानुसार व परिस्थितीनुसार परिवर्तन करून आंबेडकरी जलसाकारांनी मूळ तमाशातील गण/ नमन वगळून त्याऐवजी डॉ. आंबेडकरांना वंदन करून सादरीकरणाची सुरुवात करावी. सत्यशोधकी जलसाकारांनी तमाशातील गवळणीला फाटा देऊन थट्टा-मस्करी टाळली. येथेही तेच अपेक्षित आहे. गवळणी ऐवजी जलसात सोंगाड्या या पारंपरिक विदुषकी पात्राच्या साह्याने सूत्रधार आपल्या साथीदारांसोबत गीत, नृत्य, नाट्य, सामाजिक प्रबोधनपर जलसे सादर करतो. हा एकापरीने लोकतत्त्वांचा समाजप्रबोधनात्मक आविष्कारच होतो, असे म्हणायला हरकत नाही.

| **जलसा या कलाप्रकाराचे सादरीकरण - वेळ विभागणी** | |
|---|---|
| | |
| **सत्यशोधक जलसा** | **१५ मि.** |
| वंदनगीत | ३ मि. |
| म. फुलेंचे कार्य आणि  विचारावर आधारित गीत, कविता, अखंड | ३ मि. |
| सवाल-जवाब, फार्स किंवा प्रहसन | ९ मि. |
| | |
| **आंबेडकरी जलसा** | **१५ मि.** |
| भीमवंदना | ३ मि. |
| डॉ. आंबेडकरांच्या कार्य व विचारावर आधारित गीतकाव्य | ३ मि. |
| सवाल-जवाब, प्रहसन किंवा फार्स | ९ मि. |

१. प्रत्येक महाविद्यालयातील **६ विद्यार्थ्यांचा** (पुरुष, महिला किंवा संमिश्र) केवळ एक संघ स्पर्धेत सहभागी होऊ शकतो.

२. संघाबरोबर वादक **साथीदारांची जास्तीत जास्त संख्या ३** असेल.

३. सादरीकरणाची **वेळ जास्तीत जास्त १२ ते १५ मिनिटे** असेल.

४. **पूर्वतयारीसाठी स्वंतत्र ५ मिनिटांचा कालावधी** असेल.

५. या कलाप्रकारासाठी **इलेक्ट्रॉनिक वाद्यांचा वापर करता येणार नाही**.

६. या कलाप्रकाराच्या **सादरीकरणातून निखळ मनोरंजन, प्रबोधन आणि लोकशिक्षण** अपेक्षित आहे.

७. जलसा या कलाप्रकाराच्या **सादरीकरणात कोणत्याही धर्माच्या देवदेवता, राष्ट्रीय पुरूष यांचा अवमान होणार नाही व सामाजिक ऐक्य व एकात्मता यांना बाधा येणार नाही. कोणत्याही समाज घटकांच्या भावना दुखावल्या जाणार नाहीत, अशी दक्षता** संहिता सादरीकरणात घेणे बंधनकारक आहे.

८. सादरीकरणात अश्लीलता व उत्थानपणा असू नये.

९. मूल्यांकन प्राधान्याने **वंदनगीत, विचार आणि कार्य, सवाल-जवाब, प्रहसन/कार्य, समन्वय आणि वैविध्यावर** आधारित असेल.

## II) नृत्य विभाग

### i) भारतीय लोक/आदिवासी नृत्य (सांघिक स्पर्धा)

१. प्रत्येक सहभागी महाविद्यालयातून **किमान ८ आणि कमाल १० विद्यार्थ्यांचा केवळ एक संघ** सहभागी होऊ शकेल.

२. साथी कलाकारांची संख्या **जास्तीत जास्त ५** असेल.

३. नृत्य **मूलभूत भारतीय आदिवासी किंवा लोकनृत्य प्रकारचे** असावे; ते शास्त्रीय नृत्य नसावे.

४. सादरीकरणाची वेळ **किमान ८ ते जास्तीत जास्त १० मिनिटे** असेल.

५. **मंच/वाद्य व्यवस्था करण्यासाठी जास्तीत जास्त ८ ते १० मिनिटे** दिली जातील.

६. सादरीकरणानंतर **२ मिनिटांत सर्व साहित्य/वाद्ये काढणे आवश्यक** असेल. संघाकडून झालेला कचरा संघाने स्वत: साफ करावा.

७. सहभागी संघांनी रंगमंचावर लावलेले नेपथ्य, केलेली सजावट स्वत: काढावी.

८. चित्रपटातील लोकनृत्ये सादर करता येणार नाहीत.

९. सादरीकरणादरम्यान रेकॉर्डेड संगीत उपयोजता येणार नाही.

१०.**नृत्य संहिता (जसे- गीताचे बोल, शब्द) आणि विषय चार प्रतीत देणे बंधनकारक आहे.** ज्यावर संघाचा कोड क्रमांक लिहिलेला असेल. महाविद्यालयासंबंधीची कोणतीही खुण वा ओळख पटणारी माहिती लिहिलेली आढळल्यास संबंधित संघ बाद ठरविण्यात येईल.

११.मूल्यांकन प्राधान्याने **अस्सलपणा, संगीत, ताल, रचना, अभिनय, पोशाख, रंगभूषा, नेपथ्य, सजावट आणि एकूण प्रभाव** यावर आधारित असेल.

१२.कोणत्याही संघास ज्वलनशील पदार्थांच्या वापरास परवानगी नाही. ज्वलनशील पदार्थ रंगमंचावर आणू नयेत, आणल्यास त्या संघाचे सादरीकरण थांबवण्यात येईल.

### ii) भारतीय शास्त्रीय नृत्य (वैयक्तिक स्पर्धा)

१. प्रत्येक सहभागी महाविद्यालयातून फक्त **१ विद्यार्थी** या स्पर्धेसाठी नियुक्त केला जाईल.

२. शास्त्रीय नृत्य **कथक, कथकली, भरतनाट्यम, मणिपुरी, कुचिपुडी, मोहिनीयाट्टम किंवा ओडिसी** या भारतीय शास्त्रीय नृत्य प्रकारांपैकी असावे.

३. सादरीकरणाची एकूण वेळ **किमान १२ मिनिटे आणि जास्तीत जास्त १५ मिनिटे** असेल. वेळ गणना आयोजकांच्या अंतिम घोषणेनंतर लगेच सुरू होईल.

४. **मंच/वाद्य व्यवस्था** करण्यासाठी जास्तीत जास्त **३ मिनिटे** दिली जातील.

५. साथी कलाकारांची संख्या **कमाल ३** असेल.

६. चित्रपटांतील शास्त्रीय शैलीतील नृत्य या स्पर्धेत सादर करता येणार नाही.

७. **नृत्यातील गोष्टींची माहिती असेल तर आणि नृत्यासाठी वापरण्यात येणाऱ्या गीतांचे मराठी/हिंदी भाषेत अर्थ लिहून चार प्रतीत द्यावे**. यावर केवळ संघ संकेतांक असावा. संघाची ओळख पटवणारी खुण वा माहिती असेल तर संबंधित संघ बाद ठरविण्यात येईल.

८. मूल्यांकन **ताल, अभिनय किंवा अभिव्यक्ती, पोशाख, पायांच्या हालचाली आणि एकूण प्रभाव** यावर आधारित असेल.

## III) नाट्य विभाग

### i) एकांकिका (सांघिक स्पर्धा)

१. प्रत्येक सहभागी महाविद्यालयातून **किमान २ आणि कमाल ९ विद्यार्थी** संघात सहभागी असतील.

२. साथी कलाकारांची संख्या **कमाल ३** असेल.

३. सादरीकरणाची वेळ **किमान २५ ते जास्तीत जास्त ३० मिनिटे** असेल. वेळ गणना घोषणा सुरू होताच किंवा पडदा पूर्णपणे उघडल्यानंतर सुरू होईल, यापैकी जे अगोदर होईल त्यानुसार वेळ गणना होईल.

४. सर्व सजावट, नेपथ्य, प्रकाश योजना, ध्वनीयंत्रणा, रंगमंच व्यवस्था/प्रकाश योजना करण्यासाठी नाटकाच्या आधी **१० मिनिटे** दिली जातील. ही १० (दहा) मिनिटे रंगमंच ताब्यात घेतल्यापासून धरण्यात येतील.

५. नाटक संपल्यानंतर **५ मिनिटे** रंगमंचावर नेपथ्य व अन्य साहित्य काढण्यासाठी दिली जातील. रंगमच जसे ताब्यात दिले तसेच परत करावे.

६. सहभागी संघाने आपला सेट/मंच साहित्य, मेकअप साहित्य इत्यादी स्वतः आणावे.

७. विद्यापीठाद्वारे जनरल लाईट व आठ स्पॉट लाईट आणि डिमरची व्यवस्था करण्यात येईल. अतिरिक्त लागणारे लाईट्स संघानी स्वतः आणावेत आणि त्यास लागणारे साहित्य स्वतः उपलब्ध करुन घ्यावे.

८. **बॉक्स सेट** वापरता येणार नाही.

९. एकांकिकेचा **दिग्दर्शक** हा महाविद्यालयाचा विद्यार्थी असावा व **तांत्रिक बाजूसाठी विद्यार्थी कलावंत** व शिक्षक असावेत ज्याची संख्या ३ पेक्षा जास्त असू नये.

१०. एकांकिकेच्या लेखकाचे सादरीकरणासाठीचे परवानगी पत्र, संहिता आणि पात्र परिचय विद्यापीठ युवक महोत्सव आयोजन समितीकडे चार प्रतीत सादर करावे. **सोबत- नमुना 'आय' जोडले** असून एकांकिकेच्या परवानगीसाठी सदर फॉर्म भरून रंगभूमी परिनिरीक्षण मंडळास पाठवून परवानगी घ्यावी आणि रंगभूमी परिनिरीक्षण मंडळास शुल्क भरल्याचा पुरावा सादर करावा.

११.नाटक गद्य किंवा पद्य स्वरूपात असावे.

१२.आवश्यक परवानग्या, सेन्सॉर प्रमाणपत्रे इत्यादी घेण्याची जबाबदारी सहभागी महाविद्यालयाची असेल.

१३.एकांकिका संपल्यानंतर संबंधित एकांकिकेचा दिग्दर्शकास परीक्षकांनी चर्चेसाठी बोलविल्यास एकट्यानेच हजर व्हावे, अन्य कलावंत व शिक्षकांना सोबत नेऊ नये.

१४.सहभागी संघानी व संघ प्रमुखांनी संबधित ठिकाणी एकांकिका सादरीकरणापूर्वी अर्धा तास आधी रिपोर्टिंग करावी.

१५.मदतनीस आणि बॅकस्टेजचे ३ कलावंत रंगमंचावर येऊ नयेत, जर ते आले तर ते स्पर्धक म्हणून गणले जातील. त्यांचा आवाज/संगीत पडद्यामागूनच वापरावे.

१६.सदरील कलाप्रकारात वैयक्तिक / धार्मिक टिका, निंदा, नालस्ती, कोणाची बेइज्जत यासारख्या प्रकाराला हरकत राहील आणि यांची परवानगी नाही. असे प्रकार आढळल्यास आपला संघ बाद ठरवण्यात येईल.

१७.मूल्यांकन प्राधान्याने **एकांकिकेची गोष्ट (theme), अभिनय, नेपथ्य, दिग्दर्शन, प्रकाश, संगीत आणि एकूण प्रभाव** यावर आधारित असेल.

## ii) प्रहसन (सांघिक स्पर्धा)

१. प्रत्येक सहभागी महाविद्यालयातून **किमान ४ आणि कमाल ६ विद्यार्थी** संघात सहभागी असतील.

२. सादरीकरणाची वेळ **किमान ८ ते जास्तीत जास्त १० मिनिटे** असेल. वेळ गणना घोषणा सुरू होताच किंवा पडदा पूर्णपणे उघडल्यानंतर सुरू होईल, यापैकी जे अगोदर होईल त्यानुसार असेल.

३. **मंच/वाद्य व्यवस्था** करण्यासाठी जास्तीत जास्त **३ मिनिटे** दिली जातील.

४. साथी कलाकारांची संख्या **कमाल ३** असेल.

५. रंगभूषा, वेशभूषा, पार्श्वसंगीत वापरण्यास हरकत नाही, परंतु वैयक्तिक / हरकत राहील आणि यांची परवानगी देता येणार नाही. असे प्रकार आढळल्यास संघ बाद करण्यात येईल.

६. सहभागी संघांनी आपल्या प्रहसनाचा सारांश /गोष्ट चार प्रतीत विद्यापीठाच्या युवक महोत्सव आयोजन समितीकडे नोंदणीच्या वेळी देणे आवश्यक आहे, त्यावर संघाचा कोड क्रमांक लिहिलेला असावा. महाविद्यालया संबधीची खुण किंवा ओळख पटणारी माहिती जर लिहिली असेल तर तो संघ बाद ठरविण्यात येईल.

७. स्किटमध्ये **राष्ट्रीय/सामाजिक महत्त्वाच्या विषयावर** भर दिला जावा. वैयक्तिक टिप्पणी, द्वेषपूर्ण भाषा, किंवा धार्मिक टीका, निंदा, नालस्ती, कोणाची बेइज्जती, व्यक्तिमत्त्वावर आक्षेप घेणारे वर्तन इत्यादीस परवानगी नाही. असे आढळल्यास आपला संघ बाद करण्यात येईल.

८. अश्लीलता किंवा कडवट किंवा अप्रत्यक्षपणे खोचक अशा विनोदांना टाळावे, उपहासात्मक लेखन आणि लिखाणात निखळ विनोद अपेक्षित आहे.

९. मूल्यांकन प्राधान्याने **प्रहसनातील गोष्टीवर (थीम), अभिनय, समन्वय, नेपथ्य, रचना आणि एकूण प्रभाव** यावर आधारित असेल.

### iii) मिमिक्री/नकला (वैयक्तिक स्पर्धा)

१. प्रत्येक सहभागी महाविद्यालयातून **फक्त १ विद्यार्थी** या स्पर्धेत सहभागी होईल.

२. सादरीकरणाची वेळ **किमान ४ ते जास्तीत जास्त ५ मिनिटे** असेल. वेळ गणना आयोजकांच्या अंतिम घोषणेनंतर सुरू होईल.

३. सहभागी **मशीन/व्यक्तींचे आवाज तसेच प्रसिद्ध व्यक्तींची भाषणे** यांची नक्कल करू शकतो.

४. मंचावर सादरीकरण करावयाच्या पात्राचे नाव जाहीर करण्यास परवानगी असेल.

५. मूल्यांकन प्राधान्याने **नक्कल कौशल्य, ध्वनी आणि आवाजाचे वैविध्य** तसेच **सादरीकरणाची शैली** आणि **एकूण प्रभाव** यावर आधारित असेल.

### iv) मूक अभिनय (सांघिक स्पर्धा)

१. प्रत्येक सहभागी महाविद्यालयातून **किमान ४ आणि कमाल ६ विद्यार्थी** संघात सहभागी होऊ शकतील.

२. सहभागी विद्यार्थ्यांनी **पांढऱ्या/काळ्या तंग** (स्कीन टाईट) **कपड्यांमध्ये, चेहरा पांढरा,** चेहऱ्यावर रंगाने **उंचावलेल्या भुवया आणि मोठमोठ्या पसरट ओठांची रंगभूषा** असावी.

३. सादरीकरणाची वेळ **किमान ४ ते जास्तीत जास्त ५ मिनिटे** असेल.

४. साथी कलाकारांची संख्या **कमाल २** असेल.

५. मंच/वाद्य व्यवस्था करण्यासाठी जास्तीत जास्त **३ मिनिटे** दिली जातील.

६. मूकनाट्यात **फक्त हावभाव आणि हालचालींनी संकल्पना व्यक्त करणे** अपेक्षित आहे. प्रॉप्सचा वापर करण्यास परवानगी नसेल; परंतु सादरीकरण अधिक प्रभावी करण्यासाठी संगीत वापरण्यास परवानगी असेल.

७. सादरीकरणात वैयक्तिक टिप्पणी, द्वेषपूर्ण भाषा, धार्मिक टीका, निंदा, नालस्ती, कोणाची बेइज्जती, व्यक्तिमत्त्वावर आक्षेप घेणारे वर्तन इत्यादीस परवानगी नाही. असे आढळल्यास आपला संघ बाद करण्यात येईल.

८. मूल्यांकन प्राधान्याने **संकल्पना, सादरीकरणातील सर्जनशीलता, रंगभूषेचा वापर, संगीत आणि एकूण प्रभाव** यावर आधारित असेल.

## IV) ललित कला विभाग

### i) चित्रकला (वैयक्तिक स्पर्धा)

१. प्रत्येक सहभागी महाविद्यालयातून **फक्त १ विद्यार्थी** या स्पर्धेत सहभागी होऊ शकेल.

२. स्पर्धा **ऑन द स्पॉट** होईल, पेंटिंगचा विषय त्याच ठिकाणी संबंधित स्पर्धा प्रमुख देतील.

३. चित्रकला पूर्ण करण्यासाठी **जास्तीत जास्त २ तास ३० मिनिटे** वेळ असेल.

४. कागदाचा आकार **हाफ इम्पीरियल साईझ ड्रॉइंग पेपर (२२ x १५ इंच)** असेल.

५. कागद **विद्यापीठामार्फत पुरवण्यात येईल.**

६. पेंटिंग **ऑईल, वॉटर, पोस्टर किंवा पेस्टल रंगांमध्ये** करता येईल.

७. सहभागी विद्यार्थ्याने आपले साहित्य (ब्रशेस, रंग इ.) स्वतः आणावे.

८. मूल्यांकन प्राधान्याने **विषय, रचना, रंगांचा वापर, सादरीकरण आणि एकूण प्रभाव** यावर आधारित असेल.

### ii) कोलाज/चिकटकला (वैयक्तिक स्पर्धा)

१. प्रत्येक सहभागी महाविद्यालयातून **फक्त १ विद्यार्थी** या स्पर्धेत सहभागी होऊ शकेल.

२. स्पर्धा नियोजित जागेवर संपन्न होईल, त्याच ठिकाणी संबंधित स्पर्धा प्रमुखांनी दिलेल्या विषयावर कोलाज तयार करावा लागेल.

३. कोलाज पूर्ण करण्यासाठी **जास्तीत जास्त २ तास ३० मिनिटे** वेळ असेल.

४. कागदाचा आकार **हाफ इम्पीरियल साईझ माउंट बोर्ड पेपर (२२ x १५ इंच)** असेल, जो विद्यापीठाद्वारे पुरवण्यात येईल.

५. कोलाज तयार करण्यासाठी **जुनी मासिके, वृत्तपत्राच्या पुरवण्या** वापरणे आवश्यक आहे. हे साहित्य स्पर्धकाने स्वत: आणावे.

६. सहभागी विद्यार्थ्याने लागणारे साहित्य जसे-कात्री, चिकटवण्याचे साहित्य वगैरे स्वतः आणावे.

७. मूल्यांकन प्राधान्याने **मानसचित्र, विषय, माध्यम हाताळणे, रचना, सादरीकरण आणि एकूण प्रभाव** यावर आधारित असेल.

### iii) पोस्टर बनवणे (वैयक्तिक स्पर्धा)

१. प्रत्येक सहभागी महाविद्यालयातून **फक्त १ विद्यार्थी** या स्पर्धेत सहभागी होऊ शकेल.

२. स्पर्धा **ठरलेल्या जागेवर** होईल आणि दिलेल्या विषयावर पोस्टर तयार करावे लागेल.

३. पोस्टर पूर्ण करण्यासाठी **जास्तीत जास्त २ तास ३० मिनिटे** वेळ असेल.

४. कागदाचा आकार **हाफ इम्पीरियल साईझ माउंट बोर्ड पेपर (२२ x १५ इंच)** असेल, जो विद्यापीठाद्वारे देण्यात येईल.

५. पोस्टर **वॉटर, पोस्टर किंवा पेस्टल रंगांमध्ये** तयार करावे.

६. सहभागी विद्यार्थ्याने आपले साहित्य (ब्रशेस, रंग, इ.) स्वतः आणावे.

७. मूल्यांकन **विषयाचे सादरीकरण, रचना, टॅगलाईन, सादरीकरण आणि एकूण प्रभाव** यावर आधारित असेल.

### iv) क्ले मॉडेलिंग (वैयक्तिक स्पर्धा)

१. प्रत्येक सहभागी महाविद्यालयातून **फक्त १ विद्यार्थी** या स्पर्धेत सहभागी होऊ शकेल.

२. स्पर्धा नियोजित जागेवर संपन्न होईल आणि दिलेल्या विषयावर क्ले मॉडेल तयार करावे लागेल.

३. मॉडेल पूर्ण करण्यासाठी **जास्तीत जास्त २ तास ३० मिनिटे** वेळ असेल.

४. माती विद्यापीठाद्वारे पुरवण्यात येईल.

५. सहभागी विद्यार्थ्याने लागणारे उर्वरित साहित्य स्वतः आणावे.

६. मूल्यांकन **संकल्पना, माध्यम हाताळणे, रचना, सादरीकरण आणि एकूण प्रभाव** यावर आधारित असेल.

### v) व्यंगचित्र (वैयक्तिक स्पर्धा)

१. प्रत्येक सहभागी महाविद्यालयातून **फक्त १ विद्यार्थी** या स्पर्धेत सहभागी होऊ शकेल.

२. स्पर्धा **ठरलेल्या जागेवर** होईल आणि दिलेल्या विषयावर व्यंगचित्र तयार करावे लागेल.

३. व्यंगचित्र पूर्ण करण्यासाठी **जास्तीत जास्त २ तास ३० मिनिटे** वेळ असेल.

४. कागदाचा आकार **हाफ इम्पीरियल साईझ ड्रॉइंग पेपर (२२ x १५ इंच)** असेल, जो विद्यापीठाद्वारे पुरवण्यात येईल.

५. सहभागी विद्यार्थ्याने आपले साहित्य स्वतः आणावे.

६. मूल्यांकन **संकल्पना, विषयाचे सादरीकरण, रंगांचा वापर, रचना आणि एकूण प्रभाव** यावर आधारित असेल.

## vi) रांगोळी (वैयक्तिक स्पर्धा)

१. प्रत्येक सहभागी महाविद्यालयातून **फक्त १ विद्यार्थी** या स्पर्धेत सहभागी होऊ शकेल.

२. स्पर्धा **ठरलेल्या जागेवर** होईल आणि दिलेल्या विषयावर रांगोळी काढावी लागेल.

३. रांगोळी पूर्ण करण्यासाठी **जास्तीत जास्त २ तास ३० मिनिटे** वेळ असेल.

४. रांगोळी काढण्यासाठी **१२० x १२० सेमी** जागा दिली जाईल.

५. रांगोळीसाठी **फक्त रांगोळी पावडर आणि रंगीत रांगोळी पावडरचा** वापर करावा.

६. सहभागी विद्यार्थ्याने पांढरी रांगोळी, रंगीत रांगोळी इ. साहित्य स्वतः आणावे.

७. मूल्यांकन **संकल्पना, रंग योजना, सादरीकरणाचे घटक आणि एकूण प्रभाव** यावर आधारित असेल.

## vii) स्पॉट फोटोग्राफी (वैयक्तिक स्पर्धा)

१. प्रत्येक सहभागी महाविद्यालयातून **फक्त १ विद्यार्थी** या स्पर्धेत सहभागी होऊ शकेल.

२. सहभागी विद्यार्थ्याने स्वतःचा **डिजिटल कॅमेरा** सोबत आणावा.

३. डिजिटल कॅमेऱ्यात **मेमरी कार्ड असावे**, ते मेमरी कार्ड स्पर्धेच्या आधी परीक्षकांकडून फॉरमॅट केले जाईल.

४. फोटोग्राफी पूर्ण करण्यासाठी **जास्तीत जास्त २ तास ३० मिनिटे** वेळ दिली जाईल.

५. सहभागी विद्यार्थ्याने **दिलेल्या विषयावर फक्त ५ सर्वोत्तम छायाचित्रे** सादर करावीत.

६. छायाचित्रांमध्ये **मिक्सिंग, मॅचिंग किंवा मॉर्फिंग** करण्यास परवानगी नाही.

७. **फोटोशॉप, पिकासा किंवा इतर सॉफ्टवेअरचा** वापर करून प्रतिमा सुधारण्यासाठी परवानगी दिली जाणार नाही.

८. आयोजकांकडे या छायाचित्रांचा **कधीही आणि कुठेही वापर करण्याचा सर्व अधिकार असेल.**

९. अतिरिक्त सूचना स्पर्धा सुरू होण्याच्या वेळी दिल्या जातील.

१०. मूल्यांकन प्राधान्याने **छायाचित्राचा प्रभाव, रचना, तांत्रिक गुणवत्ता आणि विषयाशी सुसंगतता** या आधारावर होईल.

## V) साहित्य विभाग

### i) कविता वाचन (वैयक्तिक स्पर्धा)

१. प्रत्येक सहभागी महाविद्यालयातून **फक्त १ विद्यार्थी** या स्पर्धेत सहभागी होईल.

२. कविता **मराठी, हिंदी किंवा इंग्रजी** असावी.

३. सादरीकरणाची वेळ **किमान ४ ते कमाल ५ मिनिटे** असेल. वेळ गणना आयोजकांच्या अंतिम घोषणेनंतर सुरू होईल.

४. कविता स्वलिखित असावी; वाङ्मय चौर्य असल्यास संघ बाद करण्यात येईल.

५. कविता सादर करण्यापूर्वी स्व हस्ताक्षरातील कविता चार प्रतीत युवक महोत्सव आयोजन समितीकडे जमा करणे बंधनकारक आहे.

६. मूल्यांकन प्राधान्याने **कवितेचा विषय, अभिव्यक्ती, सादरीकरण, भाषा आणि एकूण प्रभाव** यावर आधारित असेल.

### ii) वक्तृत्व (वैयक्तिक स्पर्धा)

१. प्रत्येक सहभागी महाविद्यालयातून **फक्त १ विद्यार्थी** या स्पर्धेत सहभागी होऊ शकेल.

२. सादरीकरणाचे माध्यम **मराठी, हिंदी किंवा इंग्रजी** असेल.

३. सादरीकरणाची वेळ **किमान ४ ते कमाल ५ मिनिटे** असेल. वेळ गणना आयोजकांच्या अंतिम घोषणेनंतर सुरू होईल.

४. वक्तृत्व स्पर्धेसाठीचा विषय **संघ प्रमुखांच्या बैठकीत जाहीर केला जाईल.**

५. सादरीकरण **गद्य स्वरूपात असावे; काव्य किंवा गाणे अमान्य असेल.**

६. **कोणत्याही प्रकारची चिठ्ठी/कागद सोबत ठेवता येणार नाही.**

७. मूल्यांकन प्राधान्याने **प्रारंभ, विषयाचे ज्ञान/अभ्यास, सादरीकरण, भाषाशैली आणि एकूण प्रभाव** यावर आधारित असेल.

### iii) वादविवाद (सांघिक स्पर्धा)

१. प्रत्येक सहभागी महाविद्यालयातून **२ विद्यार्थ्यांचा एक संघ** सहभागी होऊ शकेल.

२. वादविवादासाठीचा विषय **संघ प्रमुखांच्या बैठकीत जाहीर केला जाईल.**

३. प्रत्येक विद्यार्थ्याला बोलण्यासाठी **किमान ४ ते कमाल ५ मिनिटे** दिली जातील.

४. संघातील एक स्पर्धक **विषयाच्या बाजूने** मांडणी करेल आणि आणि दुसरा स्पर्धक विषयाच्या **विरोधात** बोलेल.

५. दोन्ही विद्यार्थी **मराठी, हिंदी किंवा इंग्रजी** भाषेत भाषण करू शकतात. विद्यार्थी एकाच भाषेत किंवा वेगवेगळ्या भाषेत बोलू शकतात.

६. **प्रथम बोलणाऱ्या स्पर्धकासाठी खंडन करण्यास स्पर्धेशेवटी २ मि. वेळ** देण्यात येईल.

७. भाषण करताना **कोणत्याही प्रकारच्या चिठ्ठी/कागदाचा आधार घेता येणार नाही.**

८. सादरीकरणासाठी सहभागी स्पर्धकांचे लॉट्स काढून त्यांना भाषणासाठी पाचारण करण्यात येईल.

९. मूल्यांकन प्राधान्याने **प्रारंभ, विषयाचे ज्ञान/अभ्यास, सादरीकरण, भाषाशैली आणि एकूण प्रभाव** यावर आधारित असेल.

### iv) प्रश्नमंजुषा (सांघिक स्पर्धा)

१. प्रत्येक सहभागी महाविद्यालयातून **३ विद्यार्थ्यांचा एक संघ** सहभागी होऊ शकेल.

२. स्पर्धा **प्राथमिक फेरी आणि अंतिम फेरी** अशा दोन टप्प्यांत आयोजित केली जाईल.

३. प्राथमिक फेरीत लेखी परीक्षा होईल. प्राथमिक फेरीतून **कमाल ६ संघ अंतिम फेरीसाठी पात्र ठरतील.**

४. सर्व प्रश्न **मराठी/हिंदी/इंग्रजी भाषेत** असतील आणि **लेखी परीक्षेसाठी ३० मिनिटे** दिली जातील.

५. तोंडी स्पर्धेपूर्वी विविध राउंडसची माहिती/प्रकार, उत्तर देण्यासाठीचा वेळ आणि चाचणीसाठी असलेले गुण इ. माहिती दिली जाईल.

६. अंतिम फेरीत **तोंडी आणि ऑडिओ-व्हिज्युअल स्वरूपात प्रश्न विचारले जातील.**

७. मूल्यांकन प्राधान्याने **अचूक उत्तर संख्या, गती, प्रणाली, उत्तर देण्याची वेळ** यानुसार होईल.

## VI) महाराष्ट्राच्या लोककला

महाराष्ट्रातील प्रादेशिक किंवा बोली भाषेतच कला सादर करता येईल. लोककलेच्या सर्व स्पर्धेच्या सादकरीकरणाकरिता पाश्चात्य वाद्यांचा उपयोग करता येणार नाही. त्याकरिता खालील पारंपरिक वाद्ये वापरता येतील.

**वाद्ये-** पखवाज, दिमडी, संबळ, हलगी, चंडी, ढोलकी, डफ, ताशा, कच्ची, डमरु, पायपेटी, हार्मोनियम, सनई, बासरी, शिंग, सुन्द्री, पिपाणी, तुनतुणे, विणा, एकतारी, टाळ, चिपळ्या, खंजिरी, खुळखुळा, घंटी, कडी, झांज, घुंगरु, तबला, टिंगरी, सारंगी, मृदंग इत्यादी.

## i) पोवाडा (सांघिक स्पर्धा)

शिवाजी महाराजांच्या काळी शाहिरांनी कवणांचा एक नवीन प्रकार प्रचारात आणला. हा प्रकार म्हणजेच पोवाडा. वीर रसाने ओतप्रोत भरलेल्या पोवाड्यातून थकल्या-भागल्या माणसांचे मनोरंजन व्हायचे व स्फूर्ती यायची.

१. पोवाड्याचा विषय ऐतिहासिक वा ऐतिहासिक घटनांचे वर्णन, वीर स्त्री-पुरुषांच्या शौर्याचे, महापुरुषांच्या व स्वातंत्र्यसेनानी यांच्या कार्याचे वर्णन असावे.
२. पोवडा हा मुख्य शाहीराने गायला हवा. शाहीर पुरुष अथवा स्त्री असू शकते.
३. **सहभागी कलावंत ३ ते ६ असावेत** आणि **साथीदार कलावंत ३ असावेत.**
४. सादरीकरणासाठी वेळ १० मिनिटे असेल.
५. पाठीमागे विविध वाद्य वाजवून मुख्य शाहीराच्या गाण्याची साथ करणारे तीन ते सहा झिलकरी असावेत.
६. झिलकरी साथीदारांमध्ये पुरुष किंवा स्त्री वा स्त्री-पुरुष असू शकतील.
७. गायन मर्दानी, सुरेल, ताल व लयबद्ध असावे.
८. केवळ पद्यात्मक (कवणे) असू नयेत. तर त्यामध्ये कथानकाचा भाग असावा.
९. आवाजातील चढउताराबरोबरच वीर, करुण, शांत यासह अन्य रसांची निर्मिती व्हावी.
१०.डोक्यावर फेटा, बाराबंदी, अंगरखा किंवा नेहरु शर्ट, धोतर, पायजमा, जॅकेट, पगडी व शेला असा पुरुषाचा तर सादरकर्ती स्त्री कलाकार असेल तर नऊवारी साडी असा पोषाख असावा.
११.सादरीकरणासाठी मुख्य शाहिराच्या हातात डफ, इतरांच्या हातात दिमडी, शिंग, झांज, टाळ, कडी, तुनतुने, खंजिरी, चंडी यासारखी वाद्ये असावीत.

## ii) भारुड (सांघिक स्पर्धा)

संत एकनाथ महाराजांनी समाज प्रबोधनासाठी व षडविकारांवर आसूड ओढण्यासाठी भारुडाची सुरुवात केली.

१. भारूडाद्वारे अंधश्रद्धा निर्मुलन, पर्यावरण, भ्रष्टाचार, लोकसंख्या वाढ, स्त्रीभ्रूण हत्या इत्यादी विषयी जनजागृती व समाज प्रबोधन करणारे विषय मांडावेत.
२. भारुडात **एक मुख्य गायक** (निरुपणकार) व इतर दोन ते पाच सहगायक म्हणून घेता येतील.
३. पुरुष किंवा स्त्रियांना भारुड सादर करता येईल.
४. संतांची एखादी रचना असावी. त्यावरुन विविध दृष्टांत देऊन निरूपण करावे.
५. विठ्ठलाचा जयघोष करत पावली खेळत स्पर्धकांचा व्यासपीठावर प्रवेश व्हावा.
६. प्रतिकात्मक भूमिकांमधून रुपात्मक पद्धतीने तत्त्वज्ञानाची मांडणी करावी.
७. गायन सूरेल व तालबद्ध व्हावे.

८. अभिनय व नाट्यीकरणातून सादरीकरणे व्हावे.
९. निंदा, नालस्ती, बदनामी असू नये.
१०.सादरकर्त्या कलावंताचा पोषाख हा नेहरु शर्ट, पगडी, फेटा, गांधी टोपी, धोतर, पायजमा, गळ्यात उपरणे, कमरेला शेला, कपाळावर अष्टगंध, बुक्का असावा.
११.सादरीकरणात टाळ, चिपळ्या, पखवाज, तबला, पेटी, अपवादात्मक ढोलकी या वाद्यांचा अवलंब करता येईल.
१२.**कलावंतांची संख्या किमान** ३ व कमाल ६ असेल.
१३.साथीदार कलावंत ३ असतील.
१४.सादरीकरण **वेळ ८ मिनिटे** असेल.

### iii) वासुदेव (वैयक्तिक स्पर्धा)

पूर्वी श्रीकृष्णाचे रुप घेऊन पहाटेच्या पारी वासुदेव यायचा, गाणी म्हणायचा व भिक्षा मागायचा, जीवन विषयक तत्त्वज्ञान आणि दानाचं महत्त्व सांगायचा.

सादरीकरणात गायनासह प्रभावी संवाद साधणे, ठरावीक लयीत गिरक्या घेणे, हातातील टाळ व चिपळ्या लयबद्ध वाजवून सुरेल गायन करणे आवश्यक असेल.

१. दान दिल्यानंतर विलक्षण गतीने नाचत दान पावल्याची पावती देणे, जाताना वाडवडिलांचे नाव विचारणे, त्यांचा व पितरांचा नामोल्लेख करुन सर्व देवतांना दान पावले करणे, एखादी गिरकी घेऊन पावा वाजवत पुढल्या दारी जाणे या कृती अपेक्षित.
२. वासुदेव सादर करणारा कलावंत केवळ एक असेल.
३. डोक्यावर मोराची उंच निमुळती होत गेलेली मुकुटाकार टोपी, अंगात घोळदार अंगरखा, गळ्यात पुढे दोन्ही बाजूला सोडलेला शेला, काखेत झोळी, कमरेला खोचलेला पावा व जुना कोट, कपाळी व कानाला चंदनाचा टिळा अशी वेशभूषा असावी.
४. सादरीकरणात टाळ, चिपळी, पावा, पायामध्ये घुंगरु यासारखी वाद्ये उपयोजावीत.
५. वासुदेव सादर करताना एकही साथी कलावंत घेता येणार नाही.
६. सादरीकरण वेळ ५ मिनिटे असेल.

### iv) गोंधळ (सांघिक स्पर्धा)

घरातील मंगल कार्य निर्विघ्न पार पाडल्याबद्दल देवीची आराधना, स्तुती आणि पूजा करुन तिच्या उपकार स्तवनाचा विधी म्हणजेच गोंधळ तुळजाभवानी रेणुकादेवी, अंबाबाई या कुलदैवताच्या नावाने गोंधळ घालण्याचा विधी महाराष्ट्रामध्ये प्रचलित आहे. देवीचा चमत्कार व देवस्थानचे वर्णन असलेल्या कथा, स्तुती, नमन असते.

१. कथा निरुपण करणारा, सादरकर्ता **एक मुख्य गोंधळी** असावा आणि व्यासपीठावर एकूण **३ ते ६ साथी कलावंत** असावेत.
२. सुरुवातीला देवीची पारंपरिक पद्धतीने पूजा करावी. त्यासाठी देवीचा चौक, पूजेचे साहित्य व नैवैद्य इत्यादी असावे.

३. सादरीकरण क्रम पूजा, गण, देवीदेवतांना आवाहन, पारंपरिक गोंधळ, पऊड व शेवटी देवीची आरती असावा.
४. गोंधळ मुख्य गायकाने गायन करुन सादर करावा. शक्य झाल्यास संबळ वाजवून सादर करावा.
५. नृत्याला अधिक महत्त्व देऊ नये.
६. गोंधळाच्या नाट्यात स्त्रीचा सहभाग नसतो.
७. स्वरूप : ज्वारीची किंवा ऊसाची पाच ताटे बांधून मध्ये लाल कपडा अंथरुन धान्याने गादी भरतात. पाण्याने भरलेला तांब्या, पाच किंवा सात नागवेलीची पाने उलटी ठेवून मध्ये नारळ ठेवतात. धान्याच्या गादीवर घट ठेवून देवीचा टाक मांडतात. समोर विड्याची पाच पाने मांडून त्यावर खारीक, खोबरे, सुपारी, पैसा ठेवून धूप किंवा उदबत्ती लावतात. घटावर ऊसांच्या किंवा ज्वारीच्या तिटरणीला पुऱ्या, करंज्या व फुलांच्या माळा बांधतात.
८. गोंधळयाच्या अंगात मखमली अंगरखे अथवा बारबंदी, गळयात कवडयाच्या माळा, डोक्यात कनगीदार पगड्या, गळयात देवीचा टाक, पायात घुंगरु, डोक्यावरती कवड्यांची टोपी, परडी व पोत किंवा दिवटी इत्यादी उपयुक्त साहित्य असावे.
९. परडी, संबळ, तुनतुने, दिमडी, डफ, झांज, अपवादात्मक ढोलकी, हार्मोनियम इत्यादी वाद्ये असावी.
१०. मुख्यमंचावर **३ ते ६ कलाकार** आणि **साथीदार कलावंत केवळ ३** असावेत.
११. सादरीकरण कालावधी ८ मिनिटे असेल.

## v) भजन (सांघिक स्पर्धा)

थकल्या-भागल्या वारकऱ्यांना ईश्वर भक्तीत रममान होण्यासाठी निखळ आनंद प्राप्तीसाठी किंवा अध्यात्माचा प्रचार व्हावा यासाठी संतानी महाराष्ट्रात भजनाची सुरुवात केली.

१. भजनाचा **विषय अध्यात्म, तत्त्वज्ञानात्मक उपदेश** असावा.
२. **सादरीकरणात** सुरुवातीला विठ्ठलाचा जयघोष व्हावा. त्यानंतर जय-जय राम कृष्ण हरीचा गजर व्हावा. नंतर संताचा एखादा अंभग सादर करावा. पुरुष अथवा स्त्रियांना भजन सादर करता येईल.
३. **मुख्य गायक अथवा गायिका १** असेल. साथीदार कलावंत **२ ते ५** असतील.
४. मंचावर **एकूण** ३ ते ६ स्पर्धक कलावंत असावेत.
५. रागदरबारीयुक्त आलाप व तानांचा वापर करता येईल.
६. नेहरु शर्ट, धोतर, डोक्यावर पागोटे, गळयात तुळसीच्या माळा, मुलींसाठी नऊवारी साडी अशी वेशभूषा असावी.
७. टाळ, एकतारी, विणा, चिपळया, पखवाज, तंबोरा इत्यादी वाद्ये वापरावी.
८. सादरीकरण **वेळ ५ मिनिटे** असेल.

## vi) लोकगीत (सांघिक स्पर्धा)

**पार्श्वभूमी :** लोकांनी लोकांसाठी गायलेले गीत म्हणजे लोकगीत होय. सण, उत्सव, समारंभ, विविध संस्कार प्रसंगी ग्रामीण भाषेत लोकगीत गायले जाते.

१. लोकगीताचे विषय ग्रामीण जीवन, सण-उत्सवाचे वर्णन, संस्कार, आशा-निराशा, सुख-दुःख इत्यादी असावे.
२. यामध्ये ओवी, पाळणा, धनगरी गीते, आरधीगीते, विवाहगीते, भूलई, उखाणे, शेतकरी गीते, गण-गवळण, भूपाळी, निसर्ग गीते सादर करता येतील.
३. लोकगीत ग्रामीण अथवा बोली भाषेत असावे.
४. त्या-त्या लोकगीतानुसार पारंपरिक वेशभुषा असावी.
५. लोकगीताला अनुसरुन पारंपरिक वाद्ये असावीत.
६. नृत्याला महत्त्व असू नये.
७. ३ ते ६ स्पर्धक कलावंतांना सहभागी होता येईल आणि ३ साथीदार असावेत.
८. मुले, मुली अथवा मुला-मुलींचा संघ असेल.
९. सादरीकरण वेळ ५ मिनिटे असेल.

### vii) लोकनाट्य (सांघिक स्पर्धा)

लोकनाट्य हा पारंपरिक कलाप्रकार असून त्याची शैली ही लोकयमी आहे. म्हणजेच लोकांनी केलेले नाट्य. म्हणजेच लोकनाट्य होय. याचा मूळ उद्देश हा लोकरंजनातून समाजप्रबोधन हा आहे.

१. गण, गवळण, लावणी, बतावणी, वग व भैरवी हे पारंपरिक असावे.
२. लोकनाट्य हे सामाजिक, राजकीय, कौटुंबिक व विनोदी असावे.
३. सादरीकरणातून अस्सल गावराण रांगडेपणा, विनोद निर्मिती, परिस्थितीवर व्यंग्यात्मक ताशेरे असावेत.
४. संवाद अस्सल ग्रामीण बोलीभाषेतून असावेत.
५. सादरकीरणात ढोलकी, डफ, पेटी, टाळ, तुणतुने इत्यादी पारंपरिक वाद्ये असावीत.
६. **स्पर्धक कलावंत संख्या ३ ते ६** असावी आणि **साथीदार ३** असावेत.
७. सादरीकरण वेळ १० ते ३० मिनिटे असेल.

### viii) लावणी (वैयक्तिक/ सांघिक स्पर्धा)

१. लावणीचा **वेळ कमीत कमी ५ मिनिटे व जास्तीत जास्त ८ मि.** असेल.
२. सूचना घंटा (वॉर्निंग बेल) सहाव्या मिनिटाला होईल.
३. लावणीत **स्पर्धक संख्या कमीत कमी १** आणि **जास्तीत जास्त ६** असतील.
४. लावणीला वादक **साथीदार संख्या ३ ते ५** असेल.
५. लावणीमध्ये मुले-मुली किंवा केवळ मुली किंवा केवळ मुले सादरीकरण करु शकतात.
६. सादरीकरणात अश्लील हावभाव, उत्तानपणा असू नये.
७. सादरीकरणाच्या सुरुवातीला वाद्याची जगुलबंदी, मुजरा अपेक्षित आहे.
८. वेशभूषामध्ये नऊवारी साडी, शक्य असल्यास बांधणीची किंवा शिवलेली साडी असावी.
९. लावणी स्त्री किंवा पुरुष गाऊ शकतात.

१०.लावणी भेदीक (सवाल-जवाब), श्रृंगारिक (फडावरची लावणी, बैठकीची लावणी), शाहिरी, छक्कड लावणी (स्थळांचा महिमा सांगणारी लावणी) या कोणत्याही एका प्रकारामधून सादरीकरण करता येईल.
११.रेकॉर्डवर (ध्वनिमुद्रित) लावणी सादर करता येणार नाही.
१२.ढोलकी, पेटी, तुणतुणे, खंजेरी, कडी, टाळ, घुंगरु, पायपेटी, डफ, बासरी आदी पारंपरिक भारतीय वाद्यांचा वापर करता येईल.
१३.लावणी स्पर्धेच्या सादरीकरणाकरिता पाश्चात्य वाद्यांचा वापर करता येणार नाही.
१४.लावणी ही मराठी भाषेतच असली पाहिजे.

- **लघुपट (Short Film) (सांघिक स्पर्धा)**

१. प्रत्येक सहभागी महाविद्यालयाने नोंदणी प्रक्रियेच्या वेळी **नोंदणी कक्षात लघुपट** पेन ड्राइव्हमध्ये **जमा करणे अनिवार्य आहे.**
२. सहभागी संघाने **कोणत्याही विषय/थीमवर लघुपट तयार करावा.**
३. स्पर्धेत सादर करावयाचा लघुपट **१ ऑगस्ट २०२४ ते ३१ ऑक्टोबर २०२४ या कालावधीत** तयार झालेला असावा. या तारखेत लघुपट तयार झाला असल्याचे प्राचार्यांचे प्रमाणपत्र लघुपटामधील सर्व प्रमुख/ सहायक भूमिका **सहभागी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनीच कराव्यात.**
४. लघुपट तयार करण्यासाठी किंवा सादरीकरणासाठी विद्यार्थ्यांच्या संख्येवर कोणतेही बंधन नाही.
५. स्पर्धा **चित्रपट संकल्पनेवर आधारित आहे, त्यामुळे कोणतेही माहितीपट (डॉक्युमेंटरी) स्वीकारले जाणार नाहीत.**
६. लघुपटातील सामग्री/संवाद/गीत/संगीत **कशाचाही कोणत्याही व्यक्ती, समाज, धर्म** वैयक्तिक टिप्पणी, द्वेषपूर्ण भाषा, किंवा धार्मिक टीका, निंदा, नालस्ती, कोणाची बेइज्जती, व्यक्तिमत्त्वावर आक्षेप घेणारे वर्तन इत्यादीस परवानगी नाही. असे आढळल्यास आपला संघ बाद करण्यात येईल.
७. लघुपटाचा कालावधी **जास्तीत जास्त ५ मिनिटे आणि किमान ३० सेकंद** असावा.
८. वेळेच्या मर्यादेपलीकडे असलेला लघुपट स्पर्धेत नाकारला जाईल.
९. लघुपटामध्ये **क्रेडिट लिस्ट** नमूद करण्यास मनाई असेल.
१०.यापूर्वी इतर कोणत्याही स्पर्धेत/महोत्सवात सादर केलेला लघुपट या स्पर्धेसाठी ग्राह्य धरला जाणार नाही. जर असे आढळल्यास, तो अपात्र ठरेल आणि बक्षीस परत घेण्यात येईल.
११.लघुपट **MPEG४ किंवा AVI फॉरमॅटमध्ये** शूट केला जावा. याचे गुणोत्तर - **१६:९ किंवा १६:९ फुल हाइट ॲनामॉर्फिक-DV/HDV स्वरूपात.**
१२.**दिग्दर्शन, पटकथा लेखन, संवाद लेखन, गीत लेखन, संगीत दिग्दर्शन, कॅमेरा शूटिंग, प्रकाशयोजना, कला दिग्दर्शन, एडिटिंग** विद्यार्थ्यांनी केलेले असावे.
१३.एकदा निवडलेला आणि सादर केलेला लघुपट **कोणत्याही परिस्थितीत मागे घेता येणार नाही.**
१४.पारितोषिकप्राप्त **लघुपटांचे प्रदर्शन** पारितोषिक वितरण समारंभाच्या आयोजित करण्यात येईल.

१५.मूल्यांकन प्राधान्याने **कथा, पटकथेची गुणवत्ता, निर्मिती (कॅमेरा, प्रकाशयोजना, फ्रेमिंग), पोस्ट-प्रॉडक्शन (एडिटिंग, ट्रांझिशन, सातत्य), प्रतिमा (फोकस, रंग, प्रकाश) आणि ध्वनी गुणवत्ता (स्वर स्पष्टता, आवाजाचा सातत्यपूर्ण स्तर)** यावर आधारित असेल.

### * शोभायात्रा (Procession) (सांघिक स्पर्धा)

१. **उद्घाटन समारंभाच्या अगोदर** सहभागी महाविद्यालयांच्या संघांची सांस्कृतिक मिरवणूक-शोभायात्रा आयोजित करण्यात येईल.
२. सर्व सहभागी विद्यापीठे आणि त्यांच्या विद्यार्थ्यांसाठी शोभायात्रेत सहभाग **अनिवार्य** असेल.
३. मिरवणुकीदरम्यान, सहभागी संघाने **राष्ट्रीय/सामाजिक महत्त्वाच्या विषयाला प्राधान्य द्यावे, किंवा आपल्या प्रादेशिक संस्कृतीचे किंवा महाविद्यालयाचे विशेष ठळकपणे मांडावे.**
४. सहभागी संघाने **आपल्या महाविद्यालयाचा ध्वज** मिरवणुकीत असावा.
५. मूल्यांकन प्राधान्याने **आशय (थीम), पोशाख, सादरीकरण, आणि एकूण प्रभाव** यावर आधारित असेल.

## १२. कलाप्रकार सारांश

| विभाग | कार्यक्रम | सहभागी कलावंत संख्या | साथी कलावंत-कमाल संख्या | मंच / वाद्य / प्रकाश व्यवस्था करण्यासाठी कमाल वेळ | सादरीकरणाची वेळ (किमान-कमाल) |
|---|---|---|---|---|---|
| **संगीत** | | | | | |
| | भारतीय शास्त्रीय गायन (वैयक्तिक) | ०१ | ०२ | ०३ मिनिटे | ०८ - १० मिनिटे |
| | भारतीय शास्त्रीय वाद्य (तालवाद्य) (वैयक्तिक) | ०१ | ०२ | ०३ मिनिटे | ०८ - १० मिनिटे |
| | भारतीय शास्त्रीय वाद्य (सूरवाद्य) (वैयक्तिक) | ०१ | ०२ | ०३ मिनिटे | ०८ -१० मिनिटे |
| | भारतीय सुगम गायन (वैयक्तिक) | ०१ | ०२ | ०३ मिनिटे | ०४ - ०६ मिनिटे |
| | पाश्चात्य सुगम गायन (वैयक्तिक) | ०१ | ०२ | ०३ मिनिटे | ०४ - ०६ मिनिटे |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | भारतीय समूह गायन (सांघिक) | **०४ - ०६** | ०३ | ०५ मिनिटे | ०८ - १० मिनिटे |
| | पाश्चात्य समूह गायन (सांघिक) | **०४ - ०६** | ०३ | ०५ मिनिटे | ०८ - १० मिनिटे |
| | लोक वाद्यवृंद (सांघिक) | **०६ - ०९** | ०३ | १० मिनिटे | ०८ - १० मिनिटे |
| | कव्वाली (सांघिक) | **०६** | ०३ | ०५ मिनिटे | ०७ - ०८ मिनिटे |
| | जलसा (सांघिक) | **०६** | ०३ | ०५ मिनिटे | १५ - २० मिनिटे |
| **नृत्य विभाग** | | | | | |
| | भारतीय लोक/आदिवासी नृत्य (सांघिक) | **०८ - १०** | ०५ | १० मिनिटे | ०८ - १० मिनिटे |
| | भारतीय शास्त्रीय नृत्य (वैयक्तिक) | **०१** | ०३ | ०३ मिनिटे | १२ - १५ मिनिटे |
| **नाट्य विभाग** | | | | | |
| | एकांकिका (सांघिक) | **०२ - ०९** | ०३ | १० मिनिटे | २५ - ३० मिनिटे |
| | प्रहसन (सांघिक) | **०४ - ०६** | ०३ | ०३ मिनिटे | ०८ - १० मिनिटे |
| | मिमिक्री/नकला (वैयक्तिक) | **०१** | -- | -- | ०४ - ०५ मिनिटे |
| | मूकअभिनय (सांघिक) | **०४ - ०६** | ०२ | ०३ मिनिटे | ०४ - ०५ मिनिटे |
| **ललित कला विभाग** | | | | | |
| | चित्रकला (वैयक्तिक) | **०१** | -- | मर्यादा नाही | २ तास ३० मि. |
| | कोलाज (वैयक्तिक) | **०१** | -- | मर्यादा नाही | २ तास ३० मि. |
| | पोस्टर (वैयक्तिक) | **०१** | -- | मर्यादा नाही | २ तास ३० मि. |
| | क्ले मॉडेलिंग (वैयक्तिक) | **०१** | -- | मर्यादा नाही | २ तास ३० मि. |
| | व्यंगचित्र (वैयक्तिक) | **०१** | -- | मर्यादा नाही | २ तास ३० मि. |
| | रांगोळी (वैयक्तिक) | **०१** | -- | मर्यादा नाही | २ तास ३० मि. |
| | स्पॉट फोटोग्राफी (वैयक्तिक) | **०१** | -- | मर्यादा नाही | २ तास ३० मि. |
| **साहित्य विभाग** | | | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | कविता वाचन (वैयक्तिक) | ०१ | -- | -- | ०४ - ०५ मिनिटे |
| | वक्तृत्व (वैयक्तिक) | ०१ | -- | -- | ०४ - ०५ मिनिटे |
| | वादविवाद (सांघिक) | ०२ | -- | -- | ०४ - ०५ मिनिटे |
| | प्रश्नमंजुषा (सांघिक) | ०३ | -- | -- | प्राथमिक फेरी : ३० मि.<br>अंतिम फेरी : वेळ जाहीर केली जाईल |
| **महाराष्ट्राच्या लोककला** | | | | | |
| | पोवाडा (सांघिक) | ०३ - ०६ | ०३ | ०५ | १० मिनिटे |
| | भारूड (सांघिक) | ०३-०६ | ०३ | ०५ | ०८ मिनिटे |
| | वासुदेव (वैयक्तिक) | ०१ | -- | ०३ | ०५ मिनिटे |
| | गोंधळ (सांघिक) | ०३ - ०६ | ०३ | ०५ | ०८ मिनिटे |
| | भजन (सांघिक) | ०३ - ०६ | ०३ | ०५ | ०५ मिनिटे |
| | लोकगीत (सांघिक) | ०३ - ०६ | ०३ | ०५ | ०५ मिनिटे |
| | लोकनाट्य (सांघिक) | ०३ - ०६ | ०३ | ०५ | १० - ३० मि. |
| | लावणी (वैयक्तिक/सांघिक) | ०१/ ०२-०६ | ०५ | ०५ | ०५ - ०८ मि. |
| **लघुपट** | | | | | |
| | लघुपट (सांघिक) | मर्यादा नाही | मर्यादा नाही | मर्यादा नाही | ३० सेकंद. - ०५ मिनिटे |
| **शोभायात्रा** | | | | | |
| | शोभायात्रा (सांघिक) | मर्यादा नाही | मर्यादा नाही | मर्यादा नाही | |

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर

नॅक 'अ+' दर्जा

**केंद्रीय युवक महोत्सव २०२४-२५**

# प्रवेशिका (प्रपत्र - अ)

महाविद्यालयाचे नाव व पत्ता : ____________________________________________

____________________________________________ जिल्हा : ________________

**महाविद्यालयाचे दूरध्वनी क्रमांक :** ____________________________________________

## कलाप्रकारनिहाय महाविद्यालयाचा सहभाग :

| अ. क्र. | स्पर्धा | स्पर्धकांची संख्या | साथी-दार | स्पर्धेचा वेळ | सहभाग होय / नाही |
|---|---|---|---|---|---|
| ०१. | ०२. | ०३. | ०४. | ०५. | ०६. |
| **संगीत विभाग :** | | | | | |
| ०१. | भारतीय शास्त्रीय गायन (वैयक्तिक) | १ | २ | ८ ते १० मि. | |
| ०२. | भारतीय शास्त्रीय तालवाद्य (वैयक्तिक) | १ | २ | ८ ते १० मि. | |
| ०३. | भारतीय शास्त्रीय सूरवाद्य (वैयक्तिक) | १ | २ | ८ ते १० मि. | |
| ०४. | भारतीय सुगम गायन (वैयक्तिक) | १ | २ | ४ ते ६ मि. | |
| ०५. | पाश्चात्य सुगम गायन (वैयक्तिक) | १ | २ | ४ ते ६ मि. | |
| ०६. | भारतीय समूह गायन (सांघिक) | ०४-०६ | ३ | ८ ते १० मि. | |
| ०७. | पाश्चात्य समूह गायन (सांघिक) | ०४-०६ | ३ | ८ ते १० मि. | |
| ०८. | लोक वाद्यवृंद (सांघिक) | ०६-०९ | ३ | ७ ते १० मि. | |
| ०९. | कव्वाली (सांघिक) | ६ | ३ | ७ ते ८ मि | |
| १० | जलसा (सांघिक) | ६ | ३ | १५ ते २० मि | |
| **नृत्य विभाग :** | | | | | |
| ११. | भारतीय लोक / आदिवासी नृत्य (सांघिक) | ०८-१० | ५ | ८ ते १० मि. | |
| १२. | भारतीय शास्त्रीय नृत्य (वैयक्तिक) | १ | ३ | १२ ते १५ मि. | |
| **नाटय विभाग :** | | | | | |
| १३. | एकांकिका (सांघिक) | ०२-०९ | ३ | २५ ते ३० मि. | |
| १४. | प्रहसन (सांघिक) | ०४-०६ | ३ | ८ ते १० मि. | |
| १५. | मिमिक्री (वैयक्तिक) | १ | - | ४ ते ५ मि. | |
| १६. | मूकअभिनय (सांघिक) | ०४-०६ | ३ | ४ ते ५ मि. | |

| अ. क्र. | स्पर्धा | स्पर्धकांची संख्या | साथी-दार | स्पर्धेचा वेळ | सहभाग होय / नाही |
|---|---|---|---|---|---|
| ०१. | ०२. | ०३. | ०४. | ०५. | ०६. |
| **ललित कला विभाग :** | | | | | |
| १७. | चित्रकला (वैयक्तिक) | १ | -- | २ तास ३० मि. | |
| १८. | कोलाज (वैयक्तिक) | १ | -- | २ तास ३० मि. | |
| १९. | पोस्टर (वैयक्तिक) | १ | -- | २ तास ३० मि. | |
| २०. | मृदमूर्तीकला (वैयक्तिक) | १ | -- | २ तास ३० मि. | |
| २१. | व्यंगचित्रकला (वैयक्तिक) | १ | -- | २ तास ३० मि. | |
| २२. | रांगोळी (वैयक्तिक) | १ | -- | २ तास ३० मि. | |
| २३. | स्पॉट फोटोग्राफी (वैयक्तिक) | १ | -- | २ तास ३० मि. | |
| २४. | लघुपट (Short Film) (सांघिक) | मर्यादा नाही | | ३० सेकंद -५ मि. | |
| **वाङ्:मय विभाग :** | | | | | |
| २५. | कविता वाचन (वैयक्तिक) | १ | -- | ४ ते ५ मि. | |
| २६. | वक्तृत्व (वैयक्तिक) | १ | -- | ४ ते ५ मि. | |
| २७. | वादविवाद (सांघिक) | २ | -- | ४ ते ५ मि. | |
| २८. | प्रश्नमंजुषा (सांघिक) | ३ | -- | - | |
| **महाराष्ट्राच्या लोककला** | | | | | |
| २९. | पोवाडा (सांघिक) | ३ ते ६ | ३ | १० मि. | |
| ३०. | भारुड (सांघिक) | ३ ते ६ | ३ | ८ मि. | |
| ३१. | वासुदेव (वैयक्तिक) | १ | - | ५ मि. | |
| ३२. | गोंधळ (सांघिक) | ३ ते ६ | ३ | ८ मि. | |
| ३३. | भजन (सांघिक) | ३ ते ६ | ३ | ५ मि. | |
| ३४. | लोकगीत (सांघिक) | ३ ते ६ | ३ | ५ मि. | |
| ३५. | लोकनाटय (सांघिक) | ३ ते ६ | ३ | १० ते ३० मि. | |
| ३६. | लावणी (वैयक्तिक /सांघिक) | १, २ ते ६ | ३ ते ५ | ५ ते ८ मि. | |

**विद्यार्थ्यांची संख्या : मुले - मुली - एकूण -**

## प्रवेश शुल्क विवरण :

| अ.क्र. | कलाप्रकार | प्रवेश शुल्क प्रति कलाप्रकार (रु.) | एकूण शुल्क (रु.) |
|---|---|---|---|
| ०१. | सांघिक कलाप्रकार | २००.०० X ________ = | |
| ०२. | वैयक्तिक कलाप्रकार | १००.०० X ________ = | |
| | | एकूण शुल्क रु. : | |

०१. पुरुष संघप्रमुख नाव :-________________________________

भ्रमणध्वनी क्र. :-________________________________

०२. स्त्री संघप्रमुख नाव :-________________________________

भ्रमणध्वनी क्र. :-________________________________

**दिनांक :** **प्राचार्य सही व शिक्का**

दिनांक:-    डिसेंबर २०२४

## <u>हमीपत्र</u>

**प्रति,**
**मा. संचालक,**
विद्यार्थी विकास मंडळ
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
**छत्रपती संभाजीनगर.**

**महोदय,**

केंद्रीय युवक महोत्सव २०२४-२०२५ साठी आम्ही सादर करीत असलेल्या कोणत्याही कलाप्रकारात कुठल्याही प्रकारच्या भावना दुखावतील असा आशय, लेखन व सादरीकरण करणार नाही. शिवाय कुणाच्याही अस्मितेला तडा जाईल, संत व महापुरुषांचा अवमान अशा असंवैधानिक आशयाचे आमचा संघ/ आमचे महाविद्यालय/विभाग कदापि समर्थन करीत नाही व आम्ही तसे करणार नाही. याची नि:संदिग्ध ग्वाही आम्ही देत आहोत. आमच्या कुठल्याही सादरीकरणातून काही अनर्थ घडला, सामाजिक सौहार्द बिघडले तर त्याची सर्वस्वी जबाबदारी असेल.

**प्राचार्य/संचालक**

--------------------------------

--------------------------------

--------------------------------

# नमुना - "आय"

[सार्वजनिक करमणुकीच्या जागांवर नियंत्रण ठेवण्याविषयीचा नियम १३७ (२) पहा]

करमणुकीच्या कार्यक्रमासाठी लिखाणाच्या योग्यतेच्या प्रमाणपत्रासाठी करावयाचा अर्ज

(१) अर्जदाराचे संपूर्ण नाव :

(२) वय :

(२ अ) दूरध्वनी / भ्रमणध्वनी क्रमांक / E-mail. :

(३) पत्ता :

(४) ज्या व्यक्तीच्या अगर मंडळाच्या वतीने अर्ज केला असेल त्या व्यक्तीचे अगर मंडळाचे नाव. :

(५) पत्ता :

(६) कार्यक्रमाचे स्वरुप (तमाशा, मेळा, नाटक इत्यादी) :

(७) पूर्वपरीक्षणांसाठी दिलेल्या लिखाणाचे शीर्षक :

(८) लेखकाचे नाव :

(९) प्रकाशकाचे नाव :

(१०) पत्ता :

(११) प्रकाशनाचे वर्ष :

(१२) पूर्वपरीक्षणांसाठी दिलेल्या पुस्तकांच्या आवृत्तीचा क्रमांक. :

(१३) पूर्वपरीक्षणांसाठी दिलेल्या प्रतींची संख्या :

**अर्जदाराची सही**

**दिनांक :**

---

## महत्त्वाची सूचना

१. अर्जदाराने अर्जाला रुपये २ किंवा ५ चा न्यायालयीन मुद्रांक शुल्क (कोर्ट फी स्टॅम्प) लावणे व संहितेच्या २ प्रती सादर करणे आवश्यक आहे.

२. अर्जदारास सही करता येत नसेल तर मामलेदार किंवा पोलीस पाटील यांच्या समक्ष अंगठा वळवून त्याबद्दल त्या अधिकाऱ्याची सही घ्यावी.

३. कोणताही करमणुकीचा कार्यक्रम करण्याची अथवा ठेवण्याची इच्छा असलेल्या कोणत्याही इसमाने, असा कार्यक्रम ज्या दिनांकास पहिल्या प्रथम करण्यात अथवा ठेवण्यात यावयाचा असेल त्या दिनांकाच्या निदान दोन महिने अगोदर मंडळाकडून त्या कार्यक्रमाच्या योग्यतेचा दाखला मिळविण्यासाठी अध्यक्षांकडे अर्ज केला पाहिजे.

४. असा अर्ज नमुना "आय" मध्ये करण्यात आला पाहिजे. ज्या कोणत्याही अर्जात मंडळाचे समाधान होईल अशी सदरहू नमुन्यात निर्दिष्ट केलेल्या सर्व तपशिलासंबंधी माहिती नसेल तर त्याचा मंडळाकडून विचार केला जाणार नाही.

---

## कार्यालयीन उपयोगासाठी

(१) पूर्वपरीक्षण शुल्क रुपये :

(२) पावती क्रमांक :

(३) दिनांक :

(४) लिखाण्याच्या नोंदवहीचा क्रमांक :

(५) दिनांक :

रोटा/एन-११९६(१०००-९-२०२३)-१

## महत्त्वाची सूचना

(६) परिक्षणाचा अहवाल क्रमांक ........................................................................ दिनांक ............................................

श्री. / श्रीमती .............................................................................................................. यांच्या अभिप्रायानुसार

पान ........................................... / सी वर आक्षेपार्ह भाग नमूद केला आहे. तो अर्जदाराला

पत्र क्रमांक ...................................... दिनांक ...................................... पान ...................................... / सी अन्वये

कळवला आहे. अर्जदाराने आक्षेपार्ह भाग मान्य असल्याचे पत्र पान ............................................ / सी वर आहे.

हंगामी / कायम प्रमाणपत्र आक्षेपार्ह भाग नमूद करून मंजुरीसाठी सादर.

**सचिव :**

**अध्यक्ष :**